# माणूस

२ जून १९७३

५० पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर

२ जून १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये वर्ष : तेरावे — अंक : पहिला
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

## सप्रेम नमस्कार....

१९ मे, ७३


◻ 'मानवत' गावचे वार्तापत्र वाचून गलबलून गेलो. या देशात गरिबांना वाली नाही हे दिवसेंदिवस अधिकच पटत चालले आहे.

परभणीच्या कृषिविद्यापीठात जातीय-वाद नाही. कारण मराठा समाजातही गुणी माणसे आहेत. पण त्यांचे वशिले नसल्यामुळे वा त्यांना तसे लावायचे नसल्याने या त्यांच्याच जातीच्या माण-सांचीही सतत कुचंबणा होत आहे. म्हणजे ही गुणी माणसे त्यांच्याच जातीची असूनही कुचंबत आहेत; नोकरीशिवाय बेकार आहेत. मग विद्या-पीठात आहे काय ? 'आपला माणूस !' आपला म्हणजे गणगोत, मित्र, दोस्त, बगलबच्चा ! यापैकी तो काहीही असला आणि गुणवत्ता काहीही नसली तरी वर जाऊन बसतो. म्हणून हा जातीवाद नाही; 'वर्ग'वाद आहे. असो.

आनंद यादव, पुणे.

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.




# मोहोंजदारो आणि मुंबई

एक तप, बारा वर्षे पूर्ण झाली. 'माणूस' हे विधायक पुरुषार्थाचे आता एक व्यासपीठ ठरलेले आहे. महाराष्ट्राचे उत्तर टोक असलेल्या शहाद्यापासून दक्षिण टोकावरील म्हैसाळपर्यंत ग्रामीण भागाला-विशेषत: तळाशी दबलेल्या गोरगरीब मागास वर्गांना उचलून धरणारे असंख्य विषय गेल्या दहाबारा वर्षांत 'माणूस'ने हाताळले आणि शहरी सुशिक्षितांचे, नवयुवकांचे लक्ष या कुरुक्षेत्राकडे खेचून नेले. खेड्यांचे शहरीकरण हा स्वाभाविक बदल आहे. सत्ता आणि संपत्ती जेथे केंद्रित झालेली आहे अशा शहरांकडे खेडी ओढली जाणें, हळूहळू खेड्यातील तरुण, शिक्षित व चळवळ्या वर्ग शहरांकडे आकृष्ट होणे ही औद्योगिकरणाची, विकासाची ठराविक प्रक्रियाच आहे. यात नियोजनाचा, कर्तृत्वाचा भाग फार थोडा आहे. प्रवाहच या दिशेने वाहतो आहे. त्यात फक्त सामील व्हायचा प्रश्न उरतो. पण शहरांचे ग्रामीकरण होणे हे प्रवाहाविरुद्ध पोहणे आहे. ग्रामीकरण याचा अर्थ शहरातील जाणकार लोकांचे, सर्जनशील युवकांचे आपल्या उपेक्षित व परित्यक्त ग्रामीण भागाकडे लक्ष वेधले जाणें, शहरे आणि गावे यांचे तुटलेले नाते पुन्हा जोडून देणे असा आहे. यासाठी एक उलटसुलट प्रवास सारखा करावा लागतो.

एक अवघड तोल सतत सांभाळावा लागतो. सुप्यातली विहीरखोदाई असो, पदयात्रा असो किंवा सातपुड्यातील भिल्लांवरील अन्यायाला वाचा फोडणें असो, यामागील 'माणूस'ची भूमिका एकच होती. ती ही, की शहरी सुशिक्षितांनी, युवकांनी आपला हा तळ सोडू नये. तो वरचेवर ढवळून काढावा, आपणही स्वच्छ व्हावे. ही आपली सामाजिक व सांस्कृतिक पाळेमुळे आहेत. ही उघडी पडली तर आपला शहरी विकासाचा सर्व डोलाराही एखाद्या लहानशा धक्क्यानेही कोलमडून पडेल. शहरे वटवृक्ष म्हणून राहिली तर जगतील, नाहीतर शहरांचे आणि त्याबरोबर सर्व शहरी संस्कृतीचे मरणही अटळ आहे. ज्या नागरसंस्कृतींनी हा विवेक, हा समतोल, ही पाळेमुळे जोपासण्याची दक्षता बाळगली नाही त्या सर्व संस्कृतींची वाताहत झाल्याची इतिहासात नोंद आहे. ते कार्थेज कुठे आहे ? आणि ती वैभवशाली अथेन्स नगरी ! त्या संस्कृती आणि ते लोकसमूह नष्ट झाले, वाहून गेले. मोहोंजदारो काय कमी संपन्न संस्कृती होती ? पण पुरातत्त्ववेत्यांना आज ती जमिनीतून हुडकून काढावी लागत आहे. आपल्या मुंबई–कलकत्ता संस्कृतीचे तसे होणार नाही कशावरून ? द्वारका बुडाली तशी एक दिवस ही नवी उभी राहणारी आणि जुनी साहेबानें वसवलेली मुंबई महानगरीही एखाद्या प्रचंड सागरी खळबळीमुळे किंवा आकाशातील एखाद्या वेड्या अग्निवर्षावामुळे नामशेष होऊन जाईल. तिच्या आठवणी जपायलाही कुणी उरणार नाही. ग्रामीण आणि नागर या दोन संस्कृतींचा समन्वय, एक विशिष्ट तोल ज्या समाजांनी साधला तेच समाज टिकले, बाकीचे संपले. हा आपला तोल प्रथम इंग्रजांनी घालविला आणि स्वातंत्र्यानंतर आपणही तो परत साधण्याचा विशेष प्रयत्न केलेला नाही. हा तोल पुन्हा साधावा एवढाच 'माणूस'चा आग्रह आहे. खेडेगाव हा आपला, भारतीय समाजाचा तोलबिंदू आहे. हा तोलबिंदू आज ढळलेला आहे. तो सावरावा या विचाराने 'माणूस'ने खेडेगावचा, रानावनाचा रस्ता धरला आणि गेली बारा वर्षे या वाटेने तो सतत चालत आहे. आशा आहे, की इतरही अनेकजण या वाटेने निघतील, 'माणूस'ला साथ देतील. आजवर मिळाली त्यापेक्षा थोडी अधिक.

–संपादक




दहिवडी, ता. शिरूर येथे दुष्काळग्रस्त हरिजनांना कपडे वाटप.
श्री. रं. भा. देव व प्रबोधिनीचे प्राचार्य य. सं. लेले

# दुष्काळाशी झुंज ज्ञानप्रबोधिनी, पुणे

आपल्या मुख्यमंत्र्यांनी डॉ. दांडेकर अध्यक्ष असलेल्या मध्यवर्ती दुष्काळ निर्मूलन समिती किंवा तत्सम इतर अशासकीय संस्था यांची दुष्काळ निर्मूलनातील कामगिरी जवळ जवळ उपेक्षेनेच मारली. तरीपण आंतरिक ध्येयवादापोटी अशा संस्थांनी ठिकठिकाणी झीज व झळ सोसून घेऊन दुष्काळाशी

शर्थीची झुंज दिलेली आहे. रा. स्व. संघाचे दुष्काळ विमोचन कार्य संघशिस्तीने महाराष्ट्रभर चालूच आहे. पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीने आपली मर्यादित ताकद पुणे जिल्ह्यापुरती वापरून शिरूर, पुरंदर, भोर, हवेली भागात काही दीर्घ मुदतीच्या योजना हाती घेतल्या. युक्रांदने एक रसोडा चालविला. नगर जिल्ह्यात टाटा कंपनीने दोन खेड्यांचा अगदी कायापालट घडवून आणला. या सर्व अशासकीय प्रयत्नांचे योग्य ते मूल्यमापन व्हायला हवे. 'माणूस' अशा सर्व प्रयत्नांना आवर्जून व भरपूर प्रसिद्धी देत असतो. कारण हे कार्य आंतरिक उमाळ्याचे आहे. नोकरशाहीने शंभर पाझर तलाव खणले तरी ते फारसे कौतुकास्पद नाही. कारण या यंत्रणेचे ते कामच आहे. पण ज्ञान प्रबोधिनीच्या शाळेतील मुले जेव्हा दुष्काळ हटावा म्हणून कात्रज घाटापलिकडे गौडदऱ्याच्या डोंगर उतारावर दोन हजार झाडांसाठी खड्डे खणतात, वनसंवर्धनाची योजना आखतात, तेव्हा सर्वांनी हे कार्य उचलून धरायला हवे. ज्ञान प्रबोधिनीने विहिरी खोल करणे, पाझर तलाव करणे इत्यादी कामेही या भागात स्थानिक जनतेच्या सहकार्याने पुरी करीत आणलेली आहेत. नुकतीच काही पत्रकारांनी या कामांना भेट दिली. माणूस प्रतिनिधी काही जाऊ शकला नाही. पण एकदा या कार्याचा सविस्तर परिचय माणूसमधून वाचकांना सादर करण्याची कल्पना आहे. —सं.


□



रेव्हरंड, जॉन मॅक्लाइड
कार्यवाह,
ज्ञान प्रबोधिनी दुष्काळ
विमोचन परिषद

[ कूपनलिका खणणाऱ्या यंत्राशेजारी-उजवीकडे ]

# नवगणिताचे एक वर्ष




मुकुंद मणूरकर

गणिताशी ज्यांचा छत्तिसाचा आकडा— छत्तिसाचा आकडा हा शब्दप्रयोगही इथे त्यांना चालणार नाही — तर गणिताशी ज्यांचे विळ्याभोपळ्याइतके सख्य आहे अशांकरीता एक गोष्ट सांगितली जाते.

आता तिसरे महायुद्ध होईल. म्हणजे इतक्यातच होईल असे नव्हे. पण जेव्हा होईल तेव्हा ते तिसरे महायुद्ध असेल. कारण, कारण दोन आधीच होऊन गेलीत म्हणून. त्यापैकी पहिल्या युद्धात जीव गुदमरवून टाकणाऱ्या, संहारक वायूंचा उपयोग केला गेला. म्हणजे रसायनशास्त्र राबवले गेले. नंतर आईनस्टाईनसाहेबांनी वस्तुमानाचे प्रचंड शक्तीत रूपांतर होते असे दाखवून दिले. त्याबरहुकूम दुसऱ्या युद्धात शहरेच्या शहरे उध्वस्त करणारे अणूबाँब निर्माण झाले. म्हणजे येथे पदार्थविज्ञानशास्त्र कामी आले. आणि आता तिसरं युद्ध होईल ते घरबसल्या बटणे दाबून कॉम्प्युटरच्या सहाय्याने लढवले (असे म्हणतात.) म्हणजे येथे गणितशास्त्राचा वापर होणार. तेव्हा होशियार! गणितशत्रूंनो होशियार! आपल्या बचावासाठी तरी आता गणिताशी सूत जमवा.

यातील अतिशयोक्तीचा भाग जरी सोडला तरी गणित आता काळाची गरज आहे ही वस्तुस्थिती आहे. 'तीन शेराच्या भावावरून अदपावाची किमत क्षणार्धात सांगणाऱ्या मंडईतील भाजी-



वालीचे त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज एकशेऐंशी अंश असते हे माहीत नसल्यामुळे काही अडत नाही ' अशा टाईपाची वाक्ये फेकून व्यवहारात शालेय गणिताची किंमत शून्य आहे हे भासविले जाते. पण हे काही खरे नाही. आज शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक शाखेत गणित सामावलेले आहे. शेती, उत्पादन व संरक्षण ही राष्ट्राच्या उत्कर्षाची साधने. त्यासाठी गणिताचा अभ्यास आवश्यक आहे. इतकेच कशाला 'मराठी घेऊन बी. ए. व्हायचेच तर त्याला प्रमेये कशाला घोकायचीत्' असे म्हणण्याचीही सोय नाही. कारण मराठीतील कुठल्याही समीक्षा 'रचनाकृती' 'आकृतिबंध' यासारख्या शब्दांशिवाय पूर्ण होत नाही.

तात्पर्य : गणित अपरिहार्य आहे.

गणिताची ही प्रशस्ती आत्ताच करण्याचे कारण काय ? तर पूर्वीचे गणित, म्हणजे पूर्वी जे शाळेत शिकवले जाई ते, आता 'पूर्वीचे राहिलेले नाही.' आपली जीर्ण कात टाकून नव्या स्वरूपात नवगणित या नावाने ते आता आले आहे. ना. मधुकरराव चौधरींनी शिक्षणमंत्री असताना श्वेतपत्रिका काढून महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात क्रांतिकारक बदल केला. त्यातील एक भाग म्हणून गेल्या वर्षी आठवीला नवगणित अभ्यासक्रम नेमला. आणि एकच गदारोळ उठला. हा अभ्यासक्रम अवघड

पृष्ठ ५१ वर

# सो ल क ढी

## 'सखाराम बाईंडर 'चे शतक

'सखाराम बाईंडर' या विजय तेंडुलकरांच्या नाटकाने, नजिकच्या भूतकाळात, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात केवढी तरी धमाल माजवून दिली होती. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन सर्वसामान्यपणे कफल्लक असते; म्हणून तर 'सखाराम बाईंडर 'सारखे प्रकरण आपल्या एवढे जिव्हारी लागते. या नाटकाच्या निमित्ताने, विजय तेंडुलकरांना, एकाच वेळी, श्रेष्ठ आणि फालतुकडे नाटककार ठरवण्यात आले, ही एक बऱ्यापैकी गोष्ट झाली. वाईट वाटून घ्यायचे नाही म्हटले तरी एका गोष्टीचे वाईट वाटल्यावाचून रहात नाही. ती गोष्ट म्हणजे या नाटकाचे व्यावसायिक यश. हे नाटक चाललेच नसते तर याला त्या सव्वीस सह्याजीरावांच्या सुरात सूर मिसळून आम्हीही 'श्रेष्ठ' म्हणून टाकले असते. पण हे नाटक चालले; महाराष्ट्राची नैतिक रखवालदारी करणाऱ्या चिवट विरोधकांना न जुमानता चालले; सोज्वळ आणि कुटुंबवत्सल महाराष्ट्रीय प्रेक्षकवर्गाने ते चवीने आणि अधाशीपणाने पाहिले; या नाटकाची भाषांतरे होऊन इतर भाषातून त्याचे डझनांनी प्रयोग झाले; आणि खुद्द माय मराठी भाषेतील 'ओरिजिनल' तब्बल शंभर प्रयोग झाल्याची दुर्वार्ता नुकतीच आमच्या कानी आली आहे.

हे नाटक आम्ही पाहिलेले नाही, ही गोष्ट, या निमित्ताने मी मुद्दाम आपल्याला सांगतो आहे. पण ज्यांनी हे नाटक पाहिले त्यांच्याबद्दल मला फार फार काळजी वाटते हो. अन्नातील धोतऱ्याचे मला विशेष काही वाटत नाही; पण या नाटकातील धोतऱ्याने कितीतरी महाराष्ट्रीय मने किडून-सडून गेली असतील त्याचे काय ?

म्हणून 'सखाराम बाईंडर' या नाटकाचे शंभर प्रयोग झाले याकरता त्याचे आणि त्याच्या बेफाम लेखक-दिग्दर्शक-निर्मात्याचे अभिनंदन आम्हाला करता येणार नाही. उलट या प्रसंगी आम्ही असे मत व्यक्त करतो की या नाटकाचे प्रयोगावर प्रयोग पुन्हा पुन्हा बंद पडून बंद पडलेल्या प्रयोगांचा शतक-महोत्सव साजरा करण्याचा सुलक्षणी योग या संतमहंतांच्या आणि दगडांच्या महाराष्ट्रदेशात शक्य तितक्या लौकर यायला हवा आहे. कारण जी संस्था 'सखाराम बाईंडर 'सारखे नाटक सादर करते ती 'वेलकम थिएटर्स' नसून वेलकमोड थिएटर्स आहे, असेच आम्ही मानतो.

या संस्थेचे पुढील नाटक 'तुकाराम वाणी ' हे आहे. नाटककार तोच. नटवर्ग

तोच. महाराष्ट्र तोच.

हे नाटक न पाहण्याचा निर्धार आम्ही आत्तापासून केला आहे. जय लिंगनिर्मूलनसमिती. जय महाराष्ट्र. ●

## गोदाराणीचा मौलिक उपदेश

काही वर्षांपूर्वी आम्ही ब-यापैकी तरुण होतो. तरुणासारखे बोलत-हसत-जेवत होतो. तरुणासारखे (अ)विचार करत होतो. तोंडावर तारूण्यपीटिका आणि हृदयात स्वप्ने घेऊन तारुण्य कसे डौलात चालले होते. हां, स्वप्ने म्हटले त्याने भलतासलता समज करून घेऊ नका. आमच्या पिढीची स्वप्ने वेगळी; स्वप्नातील तपशीलही वेगळा. ध्येयवाद का काय म्हणतात तो उशाला घेतल्यावर कसली स्वप्ने आम्हाला पडली असतील याचा साधारण अंदाज तुम्हाला सहज करता येईल. मी एवढेच सांगतो : या साऱ्या स्वप्नांचा रंग भग-भगीत भगवा होता.

त्यावेळी प्रामाणिकपणे वाटायचे, आपल्या या पवित्र आणि प्रिय मातृ-भूमीसाठी झटून काहीतरी केले पाहिजे. जे करायचे होते त्याचे स्वरूप असेच अनिश्चित 'काहीतरी' होते. पण हे काहीतरी करायचे तर दुसरे काहीतरी करता येणार नाही, अशी माझी समजूत होती. दुसरे काहीतरी म्हणजे लग्न-बिग्न, संसार वगैरे हो. जणु लग्न केले नाही तरच प्रिय मातृभूमीसाठी काही-तरी करण्याचा परवाना प्राप्त होणार होता.

पुढे यथाकाल आमचे लग्न झाले आणि आपल्या या पवित्र आणि प्रिय मातृभूमीसाठी, महिन्याला आगाऊ ठरवलेल्या रकमेत भाजीपाला आणि मासळी बसवण्याची धडाडी आम्ही दाखवू लागलो. आजतागायत आमचे हे देशकार्य कसे निर्वेध चालू आहे; आणि आता तर पुढेही ते तसेच चालू ठेव-ण्याचा आदेश आम्हाला मिळाला आहे.

हा आदेश आम्हाला कॉम्रेड गोदा-राणी परुळेकर यांच्यासारख्या तपस्विनी-कडून मिळाला आहे. तसा हा आदेश आमचेआम्हीच आम्हाला नित्य देतच होतो; पण मनाचे समाधान होत नव्हते. थोरांचे बोल मनाला किती समाधान देतात बरे. कॉम्रेड गोदाराणी परुळेकरांनी, परवा, एका व्याख्यानात, लोकांना चक्क सुखाचा संसार करण्याचा मौलिक उपदेश केला. त्यामुळे समाज-सेवेसाठी, देशकार्यासाठी काहीतरी फार दुष्कर कार्यक्रम बाई सांगतील, अशा अपेक्षेने आलेल्या श्रोत्यांची भलतीच पंचाईत झाली. जे करण्यावाचून आप-ल्याला गत्यंतरच नाही तेच नेमके मनोभावे (आणि झटून) करण्याचा आदेश गोदाराणीने द्यावा हे विलक्षणच म्हटले पाहिजे.

असो. जेव्हा माणूस (स्वत:) जागा होतो तेव्हाच तो इतर झोपलेल्यांना जागे करू शकतो, हे प्रिय वाचकांनी सदैव चित्ती धरावे. (खरे म्हणजे हे वाक्य उगाच काहीतरी लिहिले आहे;

पण त्यातही 'मौलिक उपदेश' शोधणारे काही साक्षेपी वाचक निघतीलच.

भारतातील दुष्काळपीडित जनतेला आपल्यापरी साहाय्य करण्यासाठी ब्रिटनमधील 'ऑक्सफॅम' ही संस्था पुढे सरसावली आहे. ब्रिटनवासियांनी घरातील प्रत्येक नळामागे दोन पेन्स (सुमारे पन्नास पैसे) द्यावे, आणि भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील, ग्रस्त जनतेला सक्रीय सहानुभूती दाखवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. 'गुरु' या चित्रपटात प्रमुख भूमिका करणाऱ्या रिटा तुशिंगहॅम या अभिनेत्रीने या मोहिमेचे उद्घाटन केले. उद्घाटन करताना आपल्या घरातील सत्तावीस नळांचा हिशेब या अभिनेत्रीने लक्षात घेतला होता. या मोहिमेतून वीस लाख रुपये उभे करण्याचा निर्धार 'ऑक्सफॅम'ने केला आहे.

◻ इस्लाम धर्म परिषदेमुळे राबात नगरी आपल्याला ठाऊक झाली आहे. राबात नगरीतील राबात विद्यापीठाच्या वसतीगृहातील तीन हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींना, त्यांच्या अनैतिक वर्तनावरून, वसतीगृह सोडून जाण्याचा हुकूम देण्यात आला आहे.

◻ मेक्सिकोत लांब केस राखण्याची फॅशन अमर्याद वाढलेली असावी : कारण नापितांचा धंदा इतका बसला आहे की त्यांनी या परिस्थितीवर उपाययोजना शोधण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक बैठक बोलावली आहे.

—अनंतराव

---

सोमवार दि. २१ मे १९७३ या दिनांकापासून फ्रान्समध्ये 'मुक्ती' नावाचे एक नवे दैनिक सुरू झाले आहे. जगद्विख्यात लेखक व तत्त्वज्ञ ज्याँ पॉल सार्त्र त्या दैनिकाचे सूत्रधार आहेत. प्रस्थापिताविरुद्ध आवाज उठवू पाहणारे हे दैनिक आठ पृष्ठांचे असून आठवड्यातून पाच दिवस ते प्रकाशित होणार आहे.

---



# मोकळा घसा, उघडे कान निसर्ग पिणारे डोळे

# माणसाला गिधाडे बनविणारी ही भूक !

छाया दातार

तट्टयाच्या भिंती–वर उन्हाने तप्त पत्रे–वाऱ्याच्या गरम झळा. उष्णतामान ११५° फॅ. ते ११७° फॅ. च्या आसपास असावं. नागपूर हायकोर्टाचे चीफ जस्टिस चंद्रशेखर धर्माधिकारी समारोपाचे भाषण करत होते. व्यक्तिगत जीवनातील दुटप्पीपणा त्यांनी व्याजोक्तिपूर्ण भाषणात खुलवून सांगितला. व्यक्तिगत हितसंबंध राखून माणूस व्यवहार करत असतो. व्यक्तिगत प्रतिष्ठा हा मानबिंदु करून बाकीची मूल्ये धुडकाविली जातात. सध्याची सामाजिक परिस्थिती बदलायची असेल तर कमीत कमी व्यक्तिगत आचरण सुधारण्यापासून माणसाने सुरुवात करावी. इतकी दृष्टी या शिबिरातून आली तरी पुरे–असा आशय. शिबीरार्थी ऐकत होते.

मु. सोमनाथ. पो. मारोडा ता. मूल जि. चंद्रपूर–दुष्काळाशी विधायक झुंज या कार्यक्रमात भाग घेणारे ग्रामीण विद्यार्थी तेथे दोन महिने तळ ठोकून होते. उन्हाळ्यात काम करीत आई-वडिलांचा भार हलका करत होते. शेवटच्या दहा दिवसात त्यांना येऊन मिळाले आंतरभारती शिबिराचे विद्यार्थी गुजरातमधून, बंगालमधून. आजचा शेवटचा दिवस. दोन महिने पडलेला पडाव उठणार होता. काही आले. काही गेले. काही शेवटपर्यंत टिकून राहिले. जे टिकून राहिले त्यांना पारखून घ्यायची संधी मिळाली. पैलू पाडता आले.

बाबा आमटे बोलायले उठले. या शिबिराचे पालक, चालक, संकल्पक. महाविद्यालयातून झुंजीचे आवाहन दिले होते. १२०० नावे आली होती. कन्सेशन मिळू शकले नाही म्हणून कितीतरी जण प्रवासखर्चाअभावी येऊ शकले नाहीत. एकूण ३००-३५० विद्यार्थी येऊन गेले. १०० विद्यार्थी पहिल्यापासून ठाण मांडून बसले. आणि हे दोन महिने

सार्थकी लागले. बाबांच्या चेहऱ्यावर कृतकृत्यता होती. विरहाचे दुःख होते. शब्दकळेमध्ये जीव फुंकून ती सहज फुलविणारे बाबा आज उदास होते. शब्द पोरके झाले होते. ब्लेडच्या पात्याने जखम व्हावी, रक्त दिसू नये पण वेदना ठसठसत रहावी–ही बाबांच्या शब्दात बाबांची कासावीसी–उद्या हा सगळा परिसर स्मशान शांततेने भरून जाईल. कसे सहन करता येईल हे दुःख !

बाबांच्यासारख्या चैतन्यशील माणसाचे हे दुःख फार व्याकुळ करणारे होते. दहा दिवस बाबांचा सहवास. लक्षात आले, क्षण न् क्षण उत्कटतेने जगणारा हा विरळा माणूस. तो सौंदर्याने हरखून जातो. माणसातल्या एखाद्या छोट्याशा गुणाची झलक त्याच्या मनात मानवजातीबद्दल दुर्दम्य विश्वास पैदा करते आणि एखाद्याच्या चुकीने तो अस्वस्थ होतो. संतप्त होतो. समाजाच्या प्रगतीची अपार चळवळ, तरुणांना आवाहन करण्याचा आकांत. कोणतेही निशाण उचल, माओचे, ' चे 'चे, जनसंघाचे (?) पण निशाण दिसू दे. पाऊले पुढे पडू देत. ' संवेदनाचे शर ' शाबूत असू देत.

मुले उठतात. मोडक्या तोडक्या भाषेत बाबांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. बाबांबद्दलचे प्रेम आणि आदर ओथंबून आलाय्. एकजण घरचा किस्सा सांगतो, घरी कळविले बाबा फार चांगले आहेत. येथे वेळ चांगला जातो. तर धरून पत्र आले, ' लई ब्येस हाय, आता येताना बाबांचा प्रसाद आम्हास्नी घेऊनशान ये म्हणजे झालं. ' हिंदुस्तान अजून रेंगाळतोय्. अज्ञानात, धर्मात. बाबांची विभूतिपूजा होतेय्. सर्व निष्ठा बाबांना अर्पण केल्या जात आहेत. भीती वाटतेय्, या विभूतिपूजेने विचारांची चक्रे गाफिल राहिली नाहीत म्हणजे झाले.

एक लक्षात येतय्. मुले बोलताहेत, आत्मविश्वासाने बोलताहेत. अॅबस्ट्रॅक्ट विचार करण्याची कुवत अजून आली नाही आहे. तरी पण संवेदना हळू हळू जागृत होत आहेत. बरीचशी पोपटपंची, थोडेसे मनाच्या तळापासून ढवळून आलेले काहीतरी–मात्र बाबांच्या शब्दांनी आलेली ही मंत्रमुग्ध अवस्था तेथेच थांबायला नको–त्याच्या जोडीला शास्त्रशुद्ध विश्लेषणाची जोड हवी. निश्चित कोणत्या दिशेला जायचे आणि त्यासाठी निश्चित कोणता रस्ता घ्यायचा याचे भान हवे.

ती बाजू सांभाळली नलिनीताई पंडितांनी. पाच दिवस त्यांनी व्याख्यानमाला चालविली. महाराष्ट्रातील सामाजिक उत्थान, सुधारणेच्या प्रवाहांचे मंथन, दलितांच्या चळवळीची दिशा–ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून तात्कालिन प्रश्नांची छाननी, उत्तरे शोधण्याचा प्रयत्न. मोजकेच विद्यार्थी जमायचे ह्या बौद्धिकांना. पण त्यांना या प्रश्नांबद्दल कदर होती. युवक चळवळ, रचनात्मक संघर्षाचे त्यातील स्थान, स्त्री स्वातंत्र्य असे अनेक प्रश्न आत्मीयतेने चर्चिले गेले. लक्षात आले सामान्य खेडूत विद्यार्थी सामाजिक प्रश्नाविषयी,

अन्यायाविषयी शहरी विद्यार्थ्यापेक्षा अधिक जागरूक आहे. त्याला त्याची झळ पोचते आहे. स्थानिक राजकारणामध्ये तो बराच गुंतलेला असतो. सरकारदरबारी त्याला खरेदी विक्रीसाठी जावे लागते. गावातल्या श्रीमंत जमीनदार, बागाईतदारांना दररोजच्या जीवनात मिळणारे फायदे तो बघत असतो. सरपंचाची निवडणुक त्याच्या दारात होते. ही सर्व मुले गरीब किंवा मध्यम शेतकऱ्यांची होती. सरकारी योजनांचे बरेचसे फायदे यांच्यापर्यंत येऊन पोचले नाहीत. दुष्काळ पडला की यांच्या आईवडिलांना शेतमजूरांबरोबर खडी फोडायला जावे लागते—आम्ही एक प्रश्नपत्रिका तयार करून काही मुलाखती घेतल्या—हे लोकशाही पद्धतीचे राज्य आहे हे कित्येकांना पटत नव्हते. अन्यायाला प्रतिकार झालाच पाहिजे, संघर्षाशिवाय तो होणे शक्य नाही; संघटित झालेच पाहिजे. विद्यार्थी संघटनांनी फक्त विद्यार्थ्यांचेच प्रश्न न हाताळता सामाजिक प्रश्नांना हात घातलाच पाहिजे—अशी मते ठासून सांगितली गेली.

शिबिराला आलेल्या मुलांपैकी बहुतेकांची १० एकर ते ४० एकरपर्यंत कोरडवाहू जमीन होती. अविभक्त कुटुंब. वडील दुष्काळी कामावर. प्रवास खर्च ज्यांना करता आला तेवढेच येऊ शकले. १०–१५ मोजके असेही होते. ज्यांनी दुष्काळी कामांवरील मजूरासारखे पीसवर्क करून रोजची ३ रुपये मजूरी कमावली. प्रवासखर्च बाहेर काढला. दोन महिन्यांचे एका माणसाचे जेवणखाण निघाले. पुढच्या वर्षीच्या शिक्षणासाठी ५०-६० रुपये जमले. शिवाय दोन महिने संस्कारांचा फायदा मिळाला. शेतमजूरांची मुले जवळ जवळ नाहीतच. एकतर कॉलेजमध्ये जाणारे त्यापैकी फारच थोडे. आणि उरलेल्यांशी साधना वगैरे साप्ताहिकातून संपर्क साधणे कठीण.

पहाटे ४ वाजता लाऊडस्पीकरवरून सुंदर भक्तिगीते सुरू व्हायची. पाचपर्यंत मंडळी मुखमार्जन आटोपून न्याहारी-चहासाठी शामियानात जमायची. तांबडं फुटायच्या आधीच पहाटेच्या झिरझिरीत प्रकाशात घमेली माथ्यावर उपडी घालून शेताच्या बांधावरून पावले पाझर तलावाकडे वळायला लागायची. रोजच्या रोज पहिले घमेले टाकून उद्घाटनाचा मान कोणाचा याबद्दल चढाओढ असायची. उन्हे चकाकत जायची. तलावाचा बांध उंचावत जायचा. खोदणारे घमेली वाहणारे, बांधावर उभे राहून माती फेकणारे, स्पर्धा सुरू असायची. घमेली भरभरून आणायला वेळ झाला की 'थकले रे थकले' अशा आरोळ्या सुरू व्हायच्या. वहाणाऱ्यांना चेव यायचा. शहरच्या मुलामुलींच्या जीनस् आणि टी शर्टस् आणि खेड्यातील मुलांचे फाटके गंजीफ्रॉक आणि चड्डया – पण दोघांच्या अंगावर मातीचा थर चढला, की एकरूप झाल्याचा प्रत्यय यायचा. खेड्यातील मुले श्रमांना वाघ. शहरी मुलांचा नाजुक नखरा – चिडविणी, चर्चा, कित्येक परिसंवाद, सहभोजनाचे कार्यक्रम यांनी होणार

नाही असा परिणाम या श्रमदानाने साध्य होत होता. ग्रामीण मुलांचे प्रश्न दुखरे होते. तुम्हाला १०-१० कपडे, खाणेपिणे भरपूर. पण त्यातील आकस कमी झाला होता. ही विषमता या भांडवलशाही आर्थिक व्यवस्थेचा भाग आहे. सत्ताधाऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित राखून केलेल्या चुकीच्या नियोजनाचा परिणाम आहे, अशी जाणीव हळूहळू मनात रुजत होती.

सबंध शिबिराचे समाजवादी वातावरण याला पोषक होते. बाबा, साधनाताई, मधुभाई पंडित, चंद्रकांत शहा सर्व चालक मंडळी विद्यार्थ्यांच्या मांडीला मांडी लावून पंक्तिप्रपंच न करता जेवत होते. भांडी घासणाऱ्या बायका, स्वयंपाक करणारे पंडित सर्वच एका रांगेत होते. श्रमविभागणी होती. पण श्रमांची प्रतिष्ठा होती. N. C. C. चे कॅम्पस् इतर अनेक शिबिरे आणि हे शिबीर यात हा फरक होता. येथे उक्ति आणि कृति यांचा सुंदर मिलाफ होता. कार्यक्षमता, वात्सल्य, मित्रत्व यांचा संगम होता. येथे करडी शिस्त नव्हती. पण स्वयंशासन होते. येथे उत्साह होता. स्फूर्ती होती. विचारांना गती होती. नव्या तंत्रज्ञानाचे फळ म्हणून समृद्धी होती. शेतात तिसरे पीक डोलत होते. शिबिराचा शामियाना एखाद्या आश्रमासारखा 'अभय' होता. लांडोर होती. दोन हरिणशावके खेळत होती. जरा दूर पिंजऱ्यामध्ये 'रूपा' नावाची चित्तीण ऐन भरात होती. पायवाट जरा वाकडी करावी तर जंगल समोर उभे होते. बारमाही धबधबा होता. चंद्र चांदणे उधळायला तयार होता. दहा दिवस असे गेले – चैतन्याने रसरसलेले – मोकळा घसा, उघडे कान, निसर्ग पिणारे डोळे.

मुंबईच्या स्टेशनावर पाय ठेवताना चांद्रयानातून चंद्राची सफर करून आल्यावर पृथ्वीवर लॅन्डिंग व्हावे तसे वाटत होते. रोजच्या शहरी जीवनापासून अलग पडल्यासारखे. शहरी जीवनाची पहिली चुणूक अनुभवली नागपूर स्टेशनावर. सोमनाथपासून बसने नागपूरला पोचल्यावर बरोबरची पोळी-पिठले खाल्ले. बरेचसे उरलेले द्यायला प्रतीक्षालयात गेले. आणि खांद्यावरच्या पिशवीतून अन्न बाहेर काढता काढताच हातावर झडप बसली. १०–१५ हात माझ्या हातातील खाणे ओरबाडून घेत होते. क्षणार्धात हातातील अन्न संपले. आणि जमिनीवर पडलेले तुकडे वेचणारी मुले नजरेस पडली. मी बधीर झाले. गिधाडांनी प्रेतावर झडप घालावी – माणसाला गिधाडे बनविणारी ही भूक ! हा दुष्काळ ! ही समाजव्यवस्था ! हे प्रश्न सोडविण्याची स्फर्ती आणि कुवत या शिबिरातून आम्हाला मिळेल का ?

● ● ●

# मौजे येणेगुरमधील एक रात्र !

एक मे १९७३ !

महाराष्ट्र वर्धापन दिन सोहळा !!

उस्मानाबाद जिल्ह्यातील मौजे येणेगुर हे दीड-दोन हजार वस्तीचे गाव. तालुका उमरगापासून अवघ्या १५–२० कि. मी. अंतरावर राजमार्गाच्या कडेला वसलेले सधन शेतकऱ्यांचे गाव.

जनाबाई भ्र. गणपती दनाने !

मोलमजुरी करून दुष्काळात जगणारी मातंग समाजाची अबला. याच गावची रहाणारी. या गावात लिंगायत समाजाचे वर्चस्व जास्त प्रमाणात.

याच १ मे च्या मध्यरात्री जनाबाईस गावातील आठ सवर्णांनी कडबा चोरल्याच्या वहिमावरून बेदम मारहाण केली.

एवढ्यावरच या आठ नराधमांचे आत्मे तृप्ते झाले नाहीत. तर त्यांनी जनाचे लुगडे अक्षरश: फेडून तिला नागवी केली. लाज राखण्यासाठी हाताचासुद्धा आधार त्यांनी तिला घेऊ दिला नाही. नतर या असहाय्य अबलेची नग्नावस्थेत गावातील प्रमुख रस्त्यावरून 'धिंड' काढण्याचा निंद्य प्रकार केला गेला.

रस्त्याच्याकडेला झोपलेल्यांना उठवून या आठ मस्तवाल लोकांनी जनाच्या नग्न शरीरावर बॅटऱ्यांचा प्रकाशझोत टाकून, तिच्या शरीराचे प्रदर्शन केले. नंतर तिला रात्रभर त्याच अवस्थेत एका खोलीत कोंडून ठेवण्यात आले.

या संतापजनक घटनेचे वृत्त कळताच जिल्ह्यात खळबळ माजली. उमरग्याचे तरुण व रिपब्लिकन नेते श्री. एस्. एन्. रोंगे यांना ही घटना कळताच त्यांनी स्वत: या प्रकरणात लक्ष घालून यंत्रणेस हादरून सोडले.

उस्मानाबादचे एस. पी. श्री. राजवाडे यांनी तात्काळ येणेगुरला भेट दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स. इ. श्री. गायकवाड यांनी एकूण ८ जणांवर गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली.

कार्यकर्ते राज्यकर्ते येणेगुरला जाऊन येताहेत. परंतु या जनाची गेलेली अब्रू का परत येणार आहे ? मी ज्यावेळी या गावी गेलो तेव्हा तेथील एका सवर्णास या प्रकरणाची हकीकत विचारली तेव्हा त्याने डोक्यावरची भुवई उंच करून माहित नसल्याचा इषारा केला.

शेवटी हरिजन वाड्यात गेलो. मी वार्ताहर असून जनाबाईची भेट घ्यायची म्हणून एका कृश झालेल्या म्हाताऱ्या बाबास विचारले.

त्यावेळी जनाबाई लातूरला गेल्याचें समजले. अवती भवती एक एक जमू लागले. सर्वांचे चेहेरे भेदरलेले दिसले. त्यांना मी दिलासा देऊन हकिगत विचारली, परंतु कुणीही अवाक्षर बोलण्यास तयार नव्हते. एवढी या गावात सवर्णांची दंडेलशाही, शेवटी मी उस्मानाबादची एस. टी. गाठली.

—विलास सरवदे

# पंधरा वर्षांतील कर्तृत्व !

निळू दामले

परभणी शहरातला अण्णाजीराव गव्हाणे रस्ता.

कायम वाहणारा रस्ता. पण खाच-खळगे फार. परभणीतले लोक कित्येक दिवस मागणी करत आहेत, रस्ता दुरुस्त करा म्हणून, उपयोग होत नव्हता.

दि. १८-१९ मेला रस्त्याचे आणि लोकांचे नशीब एकदम उदयास आले. रस्त्यावर धडाधड रोलर फिरले, खडी पडली. रस्त्याचे आणि लोकांचे नष्टचर्य संपले. रस्ता चांगला झाला !

सखारामजी नखाते, गायवासराचे सेक्यूलर अनुयायी, गरिबांचा कळवळा असलेले, मराठवाड्याच्या मागासले-पणाची खंत असलेले वगैरे वगैरे. ह्यांच्या एकुलत्या एका कन्येचे लग्न होते. गव्हाणे रस्त्यावरच नखाते यांचे घर आहे, म्हणून त्याच रस्त्यावर लग्नाचा मंडप. ह्यांच्या संबंध रस्त्या-वरच फरशी घालायचा विचार होता म्हणे. पण आपल्या पाठी 'कोणीतरी' महिनाभर चौकशा करत फिरताहेत ह्याची जाणीव त्यांना अस्वस्थ करत होती. म्हणून फरशी जरी टाकली नाही तरी रोड मात्र चांगलाच तयार झाला.

इथे गमतीशीर प्रकार असतो. शेती असते ह्यादगावमध्ये, निवडून येतात मानवतमधून आणि मोठमोठे बंगले असतात परभणीला, जिल्ह्याच्या ठिकाणी.

रस्ता झाला ! पण १९-२० दोन दिवस बंदही झाला. दोन्ही बाजूला बांबू रोवून रस्त्याची तोंडे शिवण्यात आली. मोठमोठे खिळे ठोकून प्रचंड मंडप तयार झाला. डाव्या बाजूला स्त्रियांसाठी मंडप. उजवीकडे खास मागवलेल्या पोलीस बँडसाठी एक मंडप. ('लय म्हाग असतो म्हन हा ब्यांड-'कुतूहल !)

छोटे पानपट्टीवाले, भाजीपाला विक-णारे रस्त्यावर बसले, की त्यांना शिक्षा होते. मुंबईत आहे एक फिरते कोर्ट. फूटपाथवरच्या गरीब फेरीवाल्यांना शिक्षा करण्यासाठी.

पण कायदे करणाऱ्यांना कायदा लागू होत नसतो.

१९ तारखेच्या रात्रीपासून न-खाते यांच्या शांति निकेतनवर दिव्यांच्या माळा सोडल्या होत्या. २ मजल्यांचे हे घर अख्खेच्या अख्खे चमचमत होते. विजेसाठी नेहमीच्या कनेक्शनचा उपयोग करण्यात आला होता. जनरेटर वापरण्यात आला नव्हता. दिवे लकाकत होते. कमळे फुलत होती. फुलांचे रंग बदलत होते.

राज्यात सध्या विजेची टंचाई असल्याने अनेक कारखाने कमी उत्पादन करतात. बेकारीही वाढते आहे.

मंडपात १००-१२५ टच्यूब लाईट्स आहेत. २ एकर कूलर आहेत. ४० पंखे आहेत. (हे पंखे आहेत फेडरेशनचे) अर्थात जनरेटर्स नाहीतच.

१९ ला रात्री नवरदेव आले. ४-५ शे लोक होते. 'हितं' सर्व मामलाच वेगळा. वरातीच्या दोन्ही बाजूला हातात टच्यूब लाईट्स धरलेले ३०-३५ लोक रोषणाईसाठी ! ऐश्वर्य दाखविण्यासाठी ! बँड दिमतीला होताच. १९ ला रात्री ४००।५०० माणसे जेवली.

लग्नाची तयारीही खूप जोरात होती.

१५।२० दिवस आधी सुमारे १०० क्विटल (म्हणजे दहा हजार किलो) तांदूळ खरेदी केला गेला होता असे मानवत-परभणीचे लोक सांगतात. हा तांदूळ काळा भात ह्या नावाचा, आज बाजारात त्याची किंमत चार रुपये किलो आहे. १२ क्विटल गव्हाचीही खरेदी झाली होती. अर्थात ही सर्व खरेदी वेगवेगळ्या नांवावर होत असते. व्यापाऱ्याला आपण कोणाला माल देत आहोत हे माहीत असते. घेणाऱ्याला नाव आपले असले तरी कोणासाठी आपण खरेदी करत आहोत हे माहीत असते. सर्व गावच खरेदीचे आकडे जाणते !

परभणी काय सर्व महाराष्ट्रातच धान्याची टंचाई आहे. त्यासाठी दंगेही होताहेत. उपाशी लोकांवर गोळ्या झाडणाऱ्या सरकारला सत्तेवर ठेवण्यात नखाते यांचे विधानसभेतले मतही हातभार लावत असते.

परभणीच्या आसपास दुष्काळ तीव्र आहे. दुष्काळी गरिबांना धान्याचा कोटा वाढवून द्या हे सांगण्यासाठी दोन दिवसांनी वसंतरावांसमोर निदर्शने होणार आहेत. नव दांपत्याला आशीर्वाद देण्यासाठी वसंतराव येणार आहेत तेव्हा ! अर्थात तोपर्यंत रस्ता मोकळा झाला असेल, मंडप जागेवर नसेल, दिव्यांच्या माळांचा व पंख्यांचा मागमूसही नसेल !

सकाळी, २० तारखेच्या, ९-५० ला लग्न लागले. एक नव्हे तर दोन प्रकारच्या वेगवेगळ्या डिझाईन्सच्या लग्न पत्रिका छापून लोकांना बोलावण्यात आले होते. एकेका पत्रिकेची पाकिटासह किंमत ५५ पैसे. अशा ४।५ हजार तरी पत्रिका वाटल्या गेल्या असाव्यात. २।३ हजार मंडळी हजर होती. इमारत व दळणवळण खाते, जिल्हा परिषद ह्यांच्याकडूनच मंडपाचे सामान आणले

गेले होते. १॥–२ हजार रुपये तरी खर्च आला असावा.

जिल्ह्यातले अनेक सरकारी अधिकारी लग्नाला आपापल्या गाड्यातून हजर होते. तहसीलदार होते, कलेक्टर डेप्युटी कलेक्टर होते.

दुष्काळी कामावर जाऊन, स्वतःच्या पदरचे पैसे आणि अतोनात श्रम करणारे, गरीबांचे प्रश्न समजावून घेणारे, सोडवू पहाणारे तरुण कार्यकर्ते चकित झाले होते. गाडी नाही म्हणून दुष्काळी कामावर जाण्यात चालढकल करणारे सरकारी अधिकारी तेथे होते. भ्रष्टाचारी अधिकारीही तेथे होते. साहेबांना खूष करण्यासाठी आले होते.

शामराव कदम नांदेडहून आले होते. माजी मंत्री वामनराव नायक आले होते. इतरही आमदार होते. ह्या गरिबांच्या काटकसरीने केलेल्या लग्नाला आशीर्वाद देण्यासाठी ते आले होते.

सर्वांना कोका कोला–फँटा पाजण्यात आला. बर्फात थंडगार केलेला.

ज्या रिक्षावाल्यांनी आपल्या रिक्षातून हा बर्फ आणला त्यांना घरी पाणी मिळत नाही. दिवसातून एकदा येणाऱ्या टँकर पुढे २–४ बादल्या पाण्यासाठी त्यांना तासनतास उभे राहावे लागते, भांडणे मारामाऱ्या कराव्या लागतात.

लग्न पत्रिकेवर 'आहेर आणू नये' अशी सूचना होती. ज्या मंचावर वधु-वर उभे होते त्याच्या पाठच्या बाजूला नखाते साहेब घोळक्यात उभे होते. लोक स्टीलचे डबे व इतर वस्तू त्यांना देत होते. येणारी माणसे सखारामजींना प्रेमादराने मिठ्या मारून हळूच आहेर त्यांच्या खिशात ढकलत होती.

मानवतच्या एका मारवाड्याने नखातेंच्या गळ्यात सोन्याची साखळी घातली.

बराच वेळ हा प्रकार चालला होता.

हा अहेर नव्हता. ह्या फुलांच्या पाकळ्या होत्या. नखाते हा खरेच सज्जन माणूस. पैसे खर्च करून, कायदा पायदळी तुडवून जेवण घातले तर लोकांना वाईट वाटेल. त्यांचा कायद्यावरचा विश्वास उडेल, मग लोकशाहीचे काय होणार? समाजवादाचे काय होणार? ह्याची त्यांना फार चिंता! म्हणून लोकांना वाईट वाटू नये यासाठी जेवणावळी कोणाच्या डोळ्यात भरू नये याची त्यांनी फार काळजी घेतली आहे! मंडपात जेवणावळी नाहीतच! मुक्ता जिनींग मिल-मध्ये २–४शेंची जेवायची सोय. झापे लावून तेथे आचारी कामात अडकवलेले. स्टेशनरोडवरील जिल्हा परिषदेच्या काही समित्यांची अध्यक्ष, उपाध्यक्षांच्या बंगल्यातून आणखी ४–५ शे माणसांची वेगळी जेवायची सोय. नखात्यांच्या स्वतःच्या बंगल्यात व इतर अन्य ठिकाणीही अशा विभक्त सोयी करण्यात आल्या होत्या. गावातल्या वकील डॉक्टर, व्यापारी व इतरांना सवडीने जेवायला घातले जाणार आहे. लोकांना मानसिक क्लेश होऊ नयेत ह्यासाठी ह्या समाजहितदक्ष माणसाने घेतलेली काळजी पाहून माझे अंतःकरण भरून आले, गळा दाटून आला. अशा काँग्रेसच्या आमदारांची संख्या खूप आहे हे लक्षात आल्यावर किती बरे वाटले!

महाराष्ट्राच्या भवितव्याची चिंताच राहिली नाही ! !

महाराष्ट्रातल्या गरीब जनतेवर जर इतके प्रेम तर मग स्वतःच्या मुलीवर किती प्रेम असणार ! दागिन्यांनी मढवून टाकली होती. हिरे व मोती डोळे दिपवून टाकत होते. ३० हजार रुपये हुंडा आणि सोबत अँबेसिडर मोटर जावयांना देण्यात आल्याचे निकटवर्ती नातेवाईकांनी सांगितले. कापडचोपड व इतर खर्चातही काही कमी पडू देण्यात आले नव्हते.

दुष्काळामुळे खर्च जास्त करता आला नाही ह्याची खंत नखातेंच्या चेहऱ्यावर दिसत होती.

आता समारंभ संपत आला होता. लोक चालले होते. अर्ध्या मुर्ध्या शिल्लक राहिलेल्या कोका कोला–फँटाच्या बाटल्या एकत्र जमत होत्या. एक माणूस त्यातला उरला सुरला कोका कोला ओबड धोबड पोचे आलेल्या भांड्यात भरून घेत होता. आमदार रावसाहेब जामकरांच्या बंगल्याच्या आडोशाला जाऊन तो त्या पेयांचे मिश्रण पीत होता.

२–३ स्त्रिया आणि मुले वधुवरांच्यावर फेकलेल्या, मंडपभर पसरलेल्या, ज्वारीच्या अक्षता गोळा करत होते. टोपल्या भरत होत्या. सर्व प्रतिष्ठित मंडळी खुषीत होती. कोक गोळा करणाराही, ज्वारी गोळा करणारीही !

लग्नाची मंगलाष्टके छापण्यात आली होती. त्यात सर्व खाती व्यापून राहिलेले नखाते असा आमदार साहेबांचा गौरव करण्यात आला होता. त्यांचा परिचय महाराष्ट्राला होणे आवश्यक आहे.

गरीब मुलींचे बळी जाणाऱ्या मानवत ह्या गावातून हे निवडून जातात.

१९५७ ते १९७२ अशी १५ वर्षे हे विधानसभेवर आहेत. फक्त ६२ मध्ये एकदा पडले.पण त्यावेळी जिल्हा परिषदेवर निवडून जाऊन उपाध्यक्ष झाले.

अतिशय कर्तृत्ववान माणूस !

५७ मध्ये निवडून जाण्यापूर्वी हादगावचे एक साधे घर, २ विहिरी व ७२ एकर जमीन ह्यांच्या कुटुंबियांच्या नावावर होती.

आज ह्यांचे बंधू, पुतणे व इतर नातेवाईकांच्या नावावर ४५० एकर जमीन आहे. ४ विहिरी झाल्या आहेत. एकेक विहीर ३०–३५ हजारांची आहे. हादगावच्या बंगल्याची किंमत ३५००० रु. होईल. परभणीतल्या बंगल्याची किंमत आजच्या बाजार भावात एक लाखापेक्षा कमी नाही. बँक बॅलन्स किती आहे ह्याची कल्पना नाही.

आमदारसाहेब सोडून त्यांचे दोन्ही भाऊ, त्यांची व ह्यांची मुलं-मुली, सर्वांना इतर उत्पन्नाची साधने नाहीत. आता कुठे एक मुलगा एका मामुली नोकरीत आहे. म्हणजेच हे सर्व कर्तृत्व आमदारांचेच नव्हे काय ?

एवढा विकास साधण्यासाठी ह्या महर्षीला किती मार्ग चोखाळावे लागले असतील, किती श्रम आणि खटपटी कराव्या लागल्या असतील ह्याची कल्पनाच करवत नाही. 'खरेच धन्य आहे !

● ● ●

शतपावली

रवींद्र पिंगे

# लोक काय बोलत आहेत ?

दक्षिण महाराष्ट्रातलं कर्नाटक राज्याच्या थेट सीमेलगतचं शहर. एके काळी गाव दुष्काळी. आता सहकारी साखर कारखान्यामुळे अकल्पित भरभराटीचा मळवट भाळी भरण्याचं भाग्य लाभलेलं आहे. गबर बागाईतदारांच्या फटफटयांचा गावात सुळसुळाट. गावात एका टोकाला शंभर वर्षांपेक्षा अधिक आयुर्मान लाभलेलं जुनं नगर वाचनालय. मुंबई सोडून अडीचशे मैलांवरच्या, नकाशावरही कधी न पाहिलेल्या ह्या गावी मी कसा उगवलो ? पोटासाठी. व्याख्यान द्यायला. त्यानिमित्त नगर वाचनमंदिरात कार्यकर्त्यांसमवेत अटळ फेरी.

प्राचीन लाकडी कपाटात चित्रावशास्त्री, दाते वगैरेंचे दुर्मिळ कोशखंड, जुने शब्दकोश, लोकसाहित्यावरले अगदी जुने इंग्रजी ग्रंथ, गॅझेटीअर्सचे पुराणे खंड, वगैरे दौलत पाहून अक्षरक्षः दिलासा वाटला. मला दिलासा वाटला ह्याचा कार्यकर्त्यांनाही दिलासा वाटला. आदबीने म्हणाले,

“ गावच्या जहागीरदारांची ही कृपा. ते विद्याप्रेमी होते. त्यांनी ही पुस्तकं विकत घेतली. ते ब्राह्मण होते. पेशव्यांचे पाव्हणे. त्यामुळे संस्कार झकास. त्यांनी ही पुस्तकं नगर वाचनालयाला भेट म्हणून दिली. आता ती कुणीही वाचत नाही. पण तरीही आम्ही ती राखली आहेत. झुरळांची औषधं वगैरे मधून मधून मारतो. ह्या धनाचं रक्षण झालं पाहिजे. ”

‘ लोक सध्या काय वाचतात ?’ मी विचारलं.

‘ कादंबऱ्या जॅम पॉप्युलर आहेत ?

‘ इथे सर्वात लोकप्रिय लेखक कोण आहे ?’

‘ ते कसं सांगता येणार ?’

‘ सर्वात जास्त मागणी कुणाच्या पुस्तकांना आहे ?’

‘ गुलशन नंदा आणि कदम. ’

'कदम इतके पॉप्युलर आहेत ?'

'काय विचारू नका. त्यांच्या कादंबऱ्यावर जॅम उड्या पडतात. तशाच गुलशन नंदाच्या कादंबऱ्यांवरही. गुलशन नंदांची पाच-सहा मराठी भाषांतरं आहेत. ती लोकांना इतकी आवडली की तेवढ्यासाठी लोक हिंदी वाचनाचा सराव करून आता त्यांची मूळ हिंदी पुस्तकं वाचताहेत.'

'गुलशन नंदांची हिंदी पुस्तकं इतक्या दूरच्या गावी मिळतात ?'

'मिळतात नं. आमचं मराठी वाचनालय. पण लोकांच्यासाठी आम्ही गुलशन नंदांची हिंदी पुस्तकं सुद्धा ठेवतो. त्यावर तोबा उड्या पडतात.'

'आणि महादेवशास्त्री जोशी वगैरे ?'

'छे. ते आता जुने झाले.'

'जुने लेखक आता कुणीही वाचत नाही ?'

'छे, लोकांना आता गरमागरम हवं. शिवाय लोकांना एक कादंबरी आवडली की त्याच लेखकाचं दुसरं पुस्तक मागतात. मग तिसरं, चौथं, पाचवं, अशी साखळी सुरू होते. तेव्हा कुणाला जर पॉप्युलर लेखक व्हायचं असेल तर एक पुस्तक लिहून भागणार नाही. पुस्तकांची साखळी हवी.'

'इथे नाटकं वगैरे होतात ?'

'आठवड्याला दोन तरी कंपन्या उतरतातच.'

'अनुभव काय येतो ?'

'परवा शुक्रवारी 'सखाराम बाईंडर' आलं होतं. सहा हजारांचा गल्ला घेऊन गेले. पण लोक फार नाराज झाले.'

'का ?'

कारण नाटक अवघ्या दोन-अडीच तासात संपलं ! इकडे लोकांना पाच सहा तास तरी करमणूक हवी असते. आणि लोकांना जी धमाल हवी होती ती तेवढी त्यात नाहीच, तसा त्या नाटकात गरम मसाला फार कमी आहे.'

'आणखी कुणी कुणी गल्ला मिळवला ?'

'इकडे शुक्रवार हा बाजाराचा दिवस आहे. तेव्हा, जी कंपनी शुक्रवारी येते ती भरपूर पैसा घेऊन जाते. पण खरी कमाल केली बाबासाहेब पुरंदऱ्यांनी !'

'ती कशी काय ?'

'त्यांनी आठवडाभर व्याख्यानं दिली नि चौतीस हजारांचा गल्ला घेतला. त्यांची शिवाजीबद्दलची काहीतरी कल्पना आहे नि त्या कामासाठी त्यांनी पैसे घेतले.'

'कसली कल्पना आहे त्यांची ?'

'काही तरी शिवाजीबद्दलची आहे बुवा, शिवाजीच्या नावाने ते किल्ला बांधणार—की दुरुस्त करणार—असं काही तरी आहे.'

'त्यांची भाषणं कशी झाली ?'

'अगदी पीन् ड्रॉप सायलेन्स ! दहा दहा हजार लोक जमायचे. पहा, देव एकएकाला ट्रिक देतो. ज्याला जमलं. त्याला जमलं.'

कार्यकर्त्यांनी शेरेबुक पुढे केलं. 'म्हणाले 'तुमचा शेरा नोंदवा' वाटलं,

# विक्रीसाठी तयार

## राष्ट्रीय पंचांग

शके १८९५ (इ.स. १९७३-७४)

भारत सरकारतर्फे खालील १२ भाषांत प्रसिद्ध :
(इंग्रजी, संस्कृत, हिंदी, उर्दू, बंगाली, उडिया, तेलुगु, तमिळ, मल्याळम्, कन्नड, मराठी आणि गुजराती)

राष्ट्रीय पंचांग शक कालगणनेवर आधारलेल्या भारतीय राष्ट्रीय कालदर्शिकेनुसार तयार करण्यांत आलें आहे. तिथि, नक्षत्रें, योग इत्यादींची गणितें, चंद्र आणि सूर्य यांच्या स्थितीवर आधारित असून त्यांसाठी अद्य यावत् खगोलशास्त्रीय कोष्टकांचा उपयोग करून घेण्यांत आला आहे. त्यामुळे कोणतेंहि नक्षत्र, तिथि, राश्यंतर इत्यादींच्या कालाची मिनिटावरहुकूम अचूक माहिती त्यांत मिळते.

राष्ट्रीय पंचांगांत, खगोलशास्त्रज्ञ, पंचांगकर्ते आणि सर्वसामान्य जनता यांच्या दैनंदिन वापरासाठी अत्यंत उपयुक्त अशी सर्व प्रकारची आणि महत्त्वाची माहिती देण्यांत आली आहे.

*खालील ठिकाणी उपलब्ध :*

१. दि मॅनेजर ऑफ पब्लिकेशन्स,
सिव्हील लाईन्स, दिल्ली-६

२. दि डायरेक्टर,
रिजनल मिटिऑरॉलॉजिकल सेंटर,
नॉटिकल अल्मनाक युनिट,
अलिपूर, कलकत्ता-२७

३. प्रमुख शहरांमधले भारत सरकारच्या प्रकाशनांचे विक्रेते.

**आपली प्रत आजच विकत घ्या**

**एका प्रतीची किमत ५० पैसे**

davp 73/31

लिहावं की 'तुमच्या बाळबोध भोळया मनांचा हेवा वाटला.' पण प्रत्यक्षात हातून अक्षरं उतरली, 'दिलासा वाटला.'

बोरगाव.

कर्नाटकाच्या हद्दीतलं पहिलं कानडी गाव. एस. टी. त एक तेरा चौदा वर्षांची मुलगी शाळेचा युनिफॉर्म घालून चढली. बरोबर पाच सहा वर्षांचा मुलगा होता. माझ्या शेजारच्या रिकाम्या सिटवर दोघे बसले. मी त्याला माझी खिडकीकडची सीट दिली. त्याची कळी खुलली.

एस. टी. सुरू झाल्यावर त्या छोकरीने विचारलं,

'ही गाडी कुठून आली ?'

'ही इचलकरंजी-सदलगा गाडी आहे. तुला कुठं जायचंय ?'

'सदलग्याला. माझ्या वडिलांची आई तिथे रहाते. मोठं गाव आहे. पण इचलकरंजी फार पवित्र गाव आहे. तिथे पाऊस पडला. सदलग्यात एक थेंब पडला नाही. ऊस बघा कसा सुकून गेलाय. तुम्ही कुठले ?'

'मी मुंबईचा.'

'मग नटनटया बघायला मिळत असतील ना ?'

'मिळतात बघायला अधूनमधून.'

'नशिब चांगलं, ते मुंबईला जातात.'

'असं का वाटतं तुला ?'

'तुम्हाला नटनटया दिसतात की.'

हे संभाषण पुढच्या सीटवरल्या एका तरुणाने ऐकलं नि मागे वळून त्याने कुतुहलाने विचारलं,

'कुठे चाललात ?'

'बेळगावला.'

'मी सदलग्याला चाललोय. बी. एस्सी. ग्रॅज्युएट आहे.'

'सदलग्याला काय करता ?'

'मी शिक्षक आहे. हा सदलगा टॉप भाग आहे.'

'का ?'

'कारण इथं तंबाखू पिकतो. तंबाखूचं उत्पन्न इतर पिकांच्या आठपट येतं. त्यामुळे सगळे शेतकरी प्रॉस्परस आहेत. नेक्सट् टू चिकोडी सरकारला लाखांनी एक्साईज सदलग्यातच मिळतो.'

'तुमची शेतो आहे ?'

'आहे तर.'

'मग मास्तरकी का करता ?'

यंदा पाऊस पडला नाही म्हणून ही टेंपररी ॲरेंजमेंट केल्याय. आता जून-मध्ये पाऊस पडला तर मास्तरकी सोडून टाकणार. तंबाखू पिकवून पैसे मिळतील ते काय शाळेत मिळणार ?'

इतकं आत्मविश्वासपूर्वक बोलून त्याने तंबाखूच्या रित्या शेताकडे बोट दाखवीत माझं लक्ष वेधीत म्हणाला,

'तो मोर बघा.'

निष्पर्ण काळया मातीच्या ढेकळांचं शेत दूरवर पसरलेलं होतं. पिसारा आक्रसून एक मोर आपली चोच मातीत बुडवून चरत होता. मास्तर सांगू लागले,

'ह्या दोन तीन मैलाच्या परीसरात पन्नास साठ मोर आहेत. बाकी जवळ-पास कुठेही नाहीत. ही हद्द ओलांडून ते दुसऱ्या गावात कधीच जात नाहीत.

इथल्या इथं शेतात, नाहीतर शेत-कऱ्यांच्या घरावर चढून दिवसभर खेळत असतात.'

'गावकरी त्यांची शिकार करीत ? नाही करीत ?'

'कशी करतील ? राष्ट्रीय पक्षी आहे ना तो !'

चिकोडी.

महाराष्ट्राचा ज्याच्यावर दावा आहे ते हिरव्या झाडीत लपलेलं तंबाखूचं गाव. एस. टी. स्टँड गावाच्या खूप बाहेर उघड्यावर बांधून तयार आहे. पण अजून रितसर उद्‌घाटन झालेलं नाही. सर्व गाळे बंद आहेत. गावातल्या म्हाताऱ्यांची छोटी छोटी टोळकी रिकाम्या स्टँडवरल्या कोऱ्या फरशांवर हवा खात बसलेली आहेत. गावातल्या उमेदवार मुली वाऱ्याचे झेले झेलीत, कुणाचे चित्त आपल्याकडे लागले आहे काय त्याची टेहळणी करीत सडकेवर गटागटाने गस्त घालीत आहेत. एकजात साऱ्यांच्या चेहेऱ्यांचा घाट कानडी. बोलणं मात्र मराठी.

एक शिडशीडीत अंगकाठीचा, कुरळ्या केसांचा, पिवळा धम्मक बुश-कोट घातलेला तरुण गरजू नजरेने माझ्याकडे पहात पहात म्हणाला,

'आपण नवीन दिसता. आपण कोण ?'

मी कोण ते त्याला संक्षिप्तात सांगितल्यावर ते गरीबगुरीब ध्यान मला कातर आवाजात म्हणालं,

'साहेब, मी आपली माफी मागतो हं !'

'माझी माफी ? कशाला ती ?'

'नाही, मला कधीही सरकारी अंमलदार भेटले की मी त्यांची माफी मागतो. सरकारच्या ऑफिसरांचा मान ठेवलाच पाहीजे.'

'पण तुम्ही जर माझं काहीच केलेलं नाही तर माफी कशाला मागता ? काही वावगं केलं असतंत तर गोष्ट वेगळी होती.'

'काही करो वा न करो, सरकारी ऑफिसरांचा मी मान राखणारा माणूस आहे. साहेब, मी आपली माफी मागतो हं.'

'अरे, पण का ?'

'कारण, आय अॅम लिटील ड्रन्क. माझ्या पोटाचं ऑपरेशन झालंय आणि रिकाम्या पोटी एस. टी. चा प्रवास मला झेपत नाही. म्हणून प्रवासाला निघायचं असलं की आय टेक लिटील ड्रिंक. इसलिये मैं आपकी माफी चहाता हूं !'

त्याने न केलेला गुन्हा माफ करून मी शेजारच्या उपहारगृहांत चहासाठी टेकलो. चहा आला. इतक्यात तो तरुण पुन्हा माझ्या समोरच्या बाकड्यावर बसून मला म्हणाला,

'साहेब, मी तुमची माफी मागतो हं.'

मी कानाडोळा करून गल्ल्यावर गेलो. तशी त्याने माझ्या बिलाचे पंधरा पैसे टपकन् कॅशियरला दिले. मी म्हटलं, 'अहो, मी चहा मागवला; मीच प्यालो. मग मीच पैसे देतो की.' तेव्हा केविलवाण्या नजरेने तो गळ घालीत म्हणाला,

'असं कसं साहेब ? आपण बडे सरकारी ऑफिसर. तुम्हाला चहा देण्यात माझी इज्जत आहे. फक्त तुम्ही मला क्षमा करा. मी तुमची माफी मागतो हं.'

बेळगाव.

ज्या शहराचा नाद हतबल राजकारणी पुढाऱ्यांनी सोडल्यातच जमा आहे, असं शहर. तिथले एक प्रख्यात विधिज्ञ.

'अखेर विशाल गोमंतक राज्य होणार व बेळगावचा समावेश विशाल गोमंतकातच होणार. म्हणजे बेळगाव कानडयाकडे गेलं म्हणून मराठी लोकांना दुःख नको; बेळगाव अखेर महाराष्ट्राने गिळलं म्हणून कानडयांनी बोटं मोडायला नकोत. आणि महाराष्ट्रातले रेशनिंगचे नि जमीनधारणेचे जाचक नियम टळले आणि कानडयांचं करप्शन टळलं म्हणून बेळगावकर आपले सुखात ते सुखातच ! हे नाटक अखेरीस असं होणार आहे. आणि ह्याचा फायदा कोल्हापूरवाले उचलणार ! कसं विचाराल, तर सांगतो. विशाल गोमंतकाच्या निर्मितीनंतर कोल्हापूरवाले उचल खातील की आम्हाला विशाल गोमंतकात गुंफा ! महाराष्ट्रातले नेते त्यांच्यासमोर नाकं घासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करतील. मग कोल्हापूरवाले पवित्रा घेऊन खास फायदे मागतील. ते त्यांना मिळतील. म्हणजे सीमाप्रश्नाचा फायदा कोल्हापूरवाल्यांना मिळेल !'

बेळगावमधला एक पांढरपेशा :

'अहो, आम्ही सगळे ऐतखाऊ आहोत. आम्हाला पाट, ताट, वाटी, तांब्या, पेला, सर्व काही नीट मांडून तयार पाहिजे. नंतर आम्ही जेवायला बसणार. असं काय राजकारण असतं ? तिकडे आंध्रात कसं मस्तपैकी एक-एक, दोन-दोन कोटींचं नुकसान करतात ! आगगाडया जाळतात, पोस्टं जाळतात, तारकचेऱ्या जाळतात, पोलीसांनाही जाळतात. आणि आमचे लोक ? पोलीस दिसलारे दिसला की छू ! तेव्हा, आम्ही इथे कर्नाटकात आहोत ते ठीक आहोत. वुई डिझर्व इट.'

बेळगावमधली एक गृहिणी :

'तसं इथे सगळंच की हो चांगलं आहे. धान्य, भाजीपाला, दूध वगैरे सर्व काही स्वस्त आणि मुबलक आहे. आता सध्या दुष्काळाची लाट आहे ते सोडा. पण एरव्ही इथे सगळं काही छान आहे. महाराष्ट्रात आलो तर आमचं हे सगळं जाईल. मला वाटतं इथल्या महाराष्ट्रवादी लिडर्सनासुद्धा हे मनातल्या मनात पटलंय, पण नाईलाज म्हणून ते वरकरणी बोलताहेत की बेळगाव महाराष्ट्रात घाला म्हणून.'

घटप्रभा. कर्नाटकामधलं आरोग्यदायक हवेचं ठिकाण.

दावणगिरी पॅसेंजरने मी कुडचीच्या दिशेने चालली आहे. घटप्रभेला डब्यातले सगळे पॅसेंजर्स खारीसारख्या उडया मारीत उतरले नि रूळ ओलांडून जीव घेऊन धावत सुटले. बहुत करून त्यांच्यापाशी तिकीटं नसणार. डबा रिकामा झाला. मी खिडकी पकडली.

गाडी सुटल्यावर छाती चोखणारं

एक तान्हं लेकरू घेऊन--एक कंगाल, काळीकुट्री बाई तीन बोजे घेऊन डब्यात शिरली. समोरच्या बाकड्यावर बोजे मांडीत तिने विचारलं,

'दादा, टी. सी. गेला ?'

'नाही. अजून टी. सी. च आलेला नाही.' मी सांगितलं.

मग आपलं बस्तान बसवीत ती म्हणाली,

'आजकाल टी. सी. दारू पित्यात नि लई तरास देत्यात.'

'तिकिट नाही ?' मी विचारलं.

'आमच्याकडं कुठलं आलंय तिकीट ? पण कुडची ते मिरज पास आहे माझा. कुडची आलं की कटकट न्हाई.'

'पास का काढलाय ?'

'मी कुडचीला तांदूळ विकते. खोटं कशाला सांगू ? नि मंगळवार-शुक्रवार पाच घरी भिक्षा मागते.'

'का ? तांदूळ विकून पोट भरत नाही.'

'भरतं की दादा. पण आमच्या धर्मात सांगितलंय की मंगळवार-शुक्रवार पाच घरी भिक्षा मागितलीच पाहिजे. मी मिरजेतल्या पाच घरात फिरते.'

'कुठला धर्म तुमचा ?'

'आम्ही एल्लमा देवीची माणसं.'

'म्हणजे ? हिंदूच नं ?'

'हिंदूच. पण आम्ही येल्लमा देवीची माणसं. आम्ही भीक मागीतलीच पाहिजे असं आमच्या धर्मात आहे.'

'येल्लमा देवीची माणसं म्हणजे ?'

'म्हणजे ज्यांना मुलंबाळ होत नाहीत, किंवा झालेली टिकत नाहीत ते येल्लमा देवीला नवस बोलतात की, 'मला मूल होऊ दे, ते मी तुला वाहीन.' अशी वाहिलेली मुलं-मुली म्हणजे येल्लमा देवीची माणसं. त्यांना जोगतिणी म्हणतात. जोगते म्हणतात.'

'ही मुलं देवीला वहातात म्हणजे काय करतात ?'

'आठ-दहा वर्षांची झाली की मुलांना दहीभात वाढतात नि देवीला बोलतात की ही लेकरं तुझी – तू ह्यांना सांभाळ; आपली म्हण.'

'असं बोलून ती मुलं सोडण्यात येतात.'

'सोडतात असं नाही. काही काही वेळा ती मुलं आपल्या आईवडीलांजवळ रहातात. मात्र त्यांना लग्न नाही करता येत. आता मला आईवडिलांनी येल्लमा देवीला वाहिलेलं आहे. माझं लग्न आता देवीशी लागलंय.'

'मग ही लेकरं कशी झाली ?'

'तशी धर्मात मुभा आहे. देवीशी लग्न झालेल्या मुलीला वाटल्यास ती एकाच पुरुषाबरोबर राहू शकते. तिला पोरं झालेली चालतात. मात्र तिला लग्नाचा अधिकार नाही.'

'आणि देवाला वाहिलेल्या मुलाला लग्न करता येतं ?'

'नाही. त्याला मधून मधून लुगडंही नेसावं लागतं.'

'देवीशी लग्न झालेल्या बहुतेक बायांनी पुरुष केले ?'

'होय तर. पण आजकाल रांडपणा बोकाळलाय. कुठलीही बाई उठते; केस

सोडते; कुंकु घेते; डोकीवर जग घेते नि गावभर भीक मागून रांडपणा करते.'

'डोकीवर जग घेते म्हणजे ?'

'एका टोपलीत येल्लमा देवीचा पितळेचा मुखवटा ठेवून ती टोपली डोक्यावर धरून भीक मागतात. त्या देवाला 'जग' म्हणतात.'

'येल्लमा देवीचं स्थान कुठे आहे ?'

'तुम्ही अजून येल्लमा देवीचं स्थान पाहिलेलंच नाही ?'

'नाही.'

'फार जागृत स्थान आहे. घटप्रभा स्टेशनावर उतरून बसने पन्नास मैल जायचं नि मग डोंगर चढायचा. दर आवशी-पुनवेला तिथे जत्रा असते. आम्हाला वेळेला अडीचशे-तीनशे रुपये खर्च योतो. प्रसाद करावा लागतो. दही, पोहे, पाच नारळ, पाच सुपाऱ्या, पाच केळी, असे प्रसाद, चौदा देव तिथे आहेत, त्या प्रत्येक देवाला करावा लागतो.'

'देवीची गाणी, प्रार्थना आहेत ?'

'खूप आहेत की.'

'कुठल्या भाषेत ?'

'मी मराठी गाणी म्हणते. मिरजेला आमचं घर आहे.'

'घरात किती माणसं आहेत ?'

'म्हातारा, मी; तीन मुलं. मोठा मुलगा कुडचीला आता गाडीवर चढेल. तो भाजी विकतो. हे धाकटं लेकरू मी देवाला वाहिलंय.'

'पण तुम्हाला तर मुलं आहेत. मग हा नवस कशाबद्दल ?'

'नवस नाही. पण मी वाहिलाय. आठ वर्ष झाली की ह्याला देवाला देऊन टाकीन. तुम्ही कधी तरी येल्लमाला जा. जागृत स्थान आहे.'

'म्हणजे ?'

'सांगते. देवीला वाहिलेल्या जोगतिणीकडे वाईट नजरेने पाहिलेलं येल्लमा देवीला खपत नाही. चार वर्षांमागची गोष्ट. कोल्हापूरातला एक मारवाडी ब्राह्मण होता. तो देवाला डोंगरावर गेला. तिथे त्याची नजर एका जोगतिणीच्या छातीवर गेली. तो डोंगरावर तिच्या शेजारी झोपला. डोंगरावर असं कुणीही झोपायचं असतं. वाईट म्हणायचं नसतं. शेजारी लक्ष द्यायचं नसतं. तर तसा तो मारवाडी ब्राह्मण त्या जोगतिणीच्या शेजारी झोपला. मग त्याने तिच्या छातीवर हात टाकला. तशी देवी कोपली. झालं. ताबडतोब तो ब्राह्मण जोगत्या झाला. त्याची बुद्धी फिरली. तो लुगडं नेसून चार दिवसांनी कोल्हापूरला स्वतःच्या घरी परतला ! ह्या कोल्हापुरातलीच ही चार वर्षांपूर्वीची गोष्ट. असाच मागे एक दुसरा ब्राह्मण डोंगरावर आला होता. तिथे त्याची नजर एका जोगत्या पोराकडे गेली. रात्री तो त्याला चिकटून झोपला. झालं. देवाचा कोप झाला. त्या ब्राह्मणाचं घरदार नाश झालं. त्याची बायको आता पालेभाजी विकत्याय ! तुम्हीसुद्धा एकदा डोंगरावर जाऊन या. मात्र तुम्हाला जर नोकरीधंद्यात बरकत हवी असेल तर डोंगराच्या पायथ्याला एक देव आहे, त्याला नवस बोला. तो



# डोकं दुखतंय् ?
## प्रभावी आणि विश्वसनीय
# ॲनासिन
## त्वरित आराम देते



"माझं डोकं पुष्कळदा दुखतं. ॲनॅसिनपासून मला खराखुरा आराम मिळतो." बँकेत अधिकाराच्या जागेवर काम करणारे श्री. सुरेश देसाई यांचं हे मत.

**प्रभावी :** जगभर डॉक्टर्स ज्याची शिफारस करतात असे वेदनाशामक द्रव्य ॲनासिनमध्ये अधिक प्रमाणात असते. ॲनासिनमुळे वेदनांपासून त्वरित आराम मिळतो.

**विश्वसनीय :** श्री सुरेश देसाई सारख्या लक्षावधि व्यक्तींचा ॲनासिनवर विश्वास आहे. डॉक्टरांच्या बिनधोक औषधांसारखेच अनेक औषधींचे मिश्रण त्यात असते.

सर्दी-पडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूदुखी आणि दातदुखी यांवर परिणामकारक.

प्रभावी आणि विश्वसनीय
# ॲनासिन
भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक



Regd. User of TM : Geoffrey Manners & Co..Ltd.

देव नोकरदारांच्या नवसाला पावतो. येल्लमा देवीकडे नोकरीचाकरीचे नवस बोलत नाहीत.'

'जोगतिणींचे माहेरच्या नातेवाई-कांशी संबंध कसे असतात ?'

'चांगले असतात की. पण जोगत्या किंवा जोगतिण मेली की नातेवाईकांनी रडायचं नसतं. सर्व नातेवाईक माणसांनी बायांनीसुद्धा मरतीकाबरोबर नदीवर जायचं नि न रडता मढं जाळायचं. नंतर मिठाई खायाची.'

'रडायचं का नसतं ?'

'देवाचा माणूस देवाकडे गेला. मग का रडायचं ? आमच्या धर्मात सांगितेलंय तसं.'

खारेपाटण. शिवकालापासून प्रसिद्ध असलेली सागरी व्यापाराची कोकणी बाजारपेठ. आता सुक्या पाचोळ्या-सारखी निसत्त्व. मलूल.

मी होडीत बसून माझ्या खाडी-काठच्या गावी निघालो आहे. होडी-वाला मुसलमान मुलगा पंधरा वर्षांचा. तरतरीत. चेहेऱ्यावर मुसलमानी गुर्मी.

'तुझं शिक्षण किती झालंय ?'

'पाचवीत शाळा सोडली.'

'पुढे का शिकला नाहीस ?'

'ते आता कळतंय ! पण तेव्हा डोक्यात हवा ताठ होती.'

'आता जन्मभर होडी चालवणार ?'

'हो. आमच्या बापजाद्याचाच धंदा हा.'

'भाडं मिळालं नाही तर ?'

'आम्ही मुसलमान सतरा धंदे कर-णार. कैऱ्या खपवणार, नारळ खपव-णार, खलाशी होणार, बैदे विकणार, मच्छी विकणार, जाळी विणणार. आम्हाला मरण नाही. कुठेपण पोट भरणार.'

'खाडीवरल्या सगळ्या मुसल-मानांची पोटं नीट भरताहेत ?'

'भरताहेत तर. नि ज्यांची भरत नाहीत त्यांना कुवेतवाले पैसे पाठवतात. आमचे निम्मे लोक कुवेतला आहेत. ते इकडे भरपूर पैसे पाठवतात. त्यांची इथली माणसं बंगले बांधतात. मशिदी बांधतात.'

खाडीवरल्या बंदरात उतरलो. बंदरा-वर कोकणी मुसलमानांची पाच दहा घरांची वाडी आहे. घरांची नि कोंबड्या-बदकांची गिचमीड. होडीवाला काहीही म्हणो, ह्या मुसलमानांची घरं अक्षरशः चंद्रमौळी आहेत. घरातलं अठरा विश्वे दारिद्र्य डोळे वटारून येणाऱ्या गाव-वाल्यांकडे पहात आहे. वाडीत पोतंभर लहान लहान पोरं आहेत. एकाच्याही ढुंगणावर लंगोटी नाही. पण अंगलटी मात्र चांगल्या आहेत. घरचे बैदे आणि दारच्या पाण्यातली मासळी ह्यांचा हा प्रताप आहे हे उघडच आहे. मात्र त्या बालकांच्या चेहेऱ्यांवर सुखी भविष्य-काळाचं कुठलंही आश्वासन दिसत नाही, हे सत्य आहे.

• • •

# ब्राह्मणगाव घाटनांद्र आणि ?

मा. संपादक माणूस

मी वैद्यकीय पथकाबरोबर महाराष्ट्राचा दौरा केला आहे. बीड जिल्ह्यामध्ये कोळेगाव या गावी गेलो होतो. त्यावेळी हे प्रकरण लक्षात आले. गावामधील पाटील आणि त्यांचे काही सहकारी व मागासवर्गीय लोकांच्या मुलाखती घेऊन ही घटना सविस्तर लिहिली आहे.

आपला
अनिलकुमार कृष्णराव गायकवाड
(प्र. व. वास्तुशास्त्र) पुणे

बीड जिल्ह्यामधील गेवराई तालुक्यामधे कोळेगाव हजार-दीड हजार वस्तीचे गाव. गावामध्ये चार भिल्लांची, दोन चांभारांची, सात-आठ महारांची आणि दोन- तीन मातंगांची घरे आहेत. असे म्हटले तर इतर ठिकाणांप्रमाणेच सवर्णांची घरे मागासवर्गीयांच्यापेक्षा जास्तच होती. आपला धंदा आणि काम पहात होते. त्यावेळी वातावरण बरे होते.

ज़िल्हापरिषदेच्या निवडणुका आल्या. गाव मादलमोही जिल्हापरिषदेच्या सर्कलमधे आहे. या मतदारसंघामध्ये काँग्रेसच्या वतीने शिवाजीराव पंडित आणि कम्युनिस्टांच्या वतीने मुरलीधर नरवडे उभे होते. गावामधील पाटील पंडित यांचे नातेवाईक होते. पाटलांच्या बाजूने म्हणजे पंडित यांचे बाजूने पाटलांचे नेतृत्वाखाली गावामधील सर्व सवर्णांनी प्रचार करण्याचे ठरविले. परंतु थोडा जाणकार असा दलितांचा पुढारी बाबू भिल्ल याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी मात्र नरवड्यांचे बाजूने प्रचारास सुरुवात केली. त्यांना एकमेकांना कोणताही पक्ष स्वीकारण्याचे स्वातंत्र्य होते. परंतु पाटलांना वाटत होते की या सर्व दलितांनी आमच्याच बाजूने प्रचार करावा. हे त्यांनी बाबूला एक-दोन वेळा सुचविलेसुद्धा; परंतु शेवटी निवडणुकीच्या वादळामुळे या दोन्ही गटांमधील एकमेकाबद्दलचे द्वेष मात्र पक्के राहिले गेले.

त्यानंतर तावडतोब दुसऱ्या महिन्यात ग्रामपंचायतीच्या निवडणुका आल्या.

त्यावेळी मात्र हे दोन्ही गटाचे पुढारी एकमेकांविरुद्ध म्हणजे ज्या वॉर्डमधून बाबूने फॉर्म भरला होता त्याच वॉर्डमधून पाटलांनी देखील अर्ज भरला. शेवटी बाबू भिल्ल आपल्या कर्तृत्वावर ग्रामपंचायतीच्या निवडणूकीमध्ये जिंकला. द्वेषाचे वादळ मात्र त्यामुळे भयानक वाढले.

गावामधे पाटलांचा अपमान एखादा भिल्ल करतो आहे असे वार पाटलांच्या अब्रूवर होऊ लागले. हा घोर अपमान भरून काढण्याची खूणगाठ पाटलांनी आपल्या मनाशी पक्की बांधली. बाबू भिल्ल ग्रामपचायत सदस्य ही गोष्ट गावामधील सवर्णांनादेखील खटकली. गावामधील अशा मतांचे सर्व लोक अठ्ठावीस जुलै ७२ ला मारुतीच्या मंदिरासमोर जमा झाले होते. तेथे एक बैठक भरली होती आणि बैठकीनंतर मारुतीला एक निश्चयाचा नारळ फोडण्याला आला. आणि गुलाल उधळून एक मिरवणूक निघाली. ढोल ताशे वाजत मिरवणूक गावांतील प्रमुख रस्त्यांनी जात होती त्यावेळी दवंडीही दिली होती. त्यामध्ये सूचना दिल्या जात होत्या, की बाबू भिल्ल व त्याचे तीन भाऊ यांना विश्वनाथ महाराच्या घरामधील आणि मफाजी चांभाराच्या घरातील माणसांना (स्त्री-पुरुषांना) गावातील दुकानावर तेल, मीठ, मिरची, बिडी-काडी आणि दैनंदिन जीवनास लागणाऱ्या आवश्यक वस्तू देवू नयेत. तसेच गिरणीवर दळण दळून देवू नये. त्याचप्रमाणे गावातील प्रमुख रस्त्याने हिंडू फिरू देवू नये. या मिरवणूकीचे विसर्जन पुन्हा मारुतीच्या मंदिरासमोर झाले. त्यावेळी मिरवणुकीतील सर्व लोकांना ताकीद दिली गेली की या लोकांना कोणी सामान दिले तर त्यास दंड केला जाईल आणि कोणत्याही प्रकारचा संबंध या लोकांबरोबर ठेवणारास देखील यांच्याच पंक्तीमध्ये बसविण्यात येईल. म्हणून कोणीही या नियमाचे उल्लंघन करू नये हे सर्व त्याच दिवसापासून आचरणातदेखील आले. (सदर प्रकरणाची फिर्याद व सामाजिक बहिष्काराची वार्तादेखील एकोणतीस तारखेस डी. एस. पी. बीड यांचेकडे दिलेली आहे.)

पोलिसांनी या सात-आठ लोकांना (बाबू वगैरेंना) पकडून नेले. नंतर मात्र त्यांच्या कुटुंबियांचे भयाण हाल झाले. गावामध्ये धान्य मिळत नाही. कोणतीही वस्तू मिळत नाही, दळण दळण्यासाठी परगावी जावे लागते. अक्षरशः जिवंत मरण्याची पाळी या सर्वांच्या कुटुंबियांवर आली. आठ दिवसानंतर या अतिभयानक त्रासाला कंटाळून बाबू भिल्लाची बायको तुळसाबाईने (की जीने मराठा असूनसुद्धा घरच्या लोकांच्या संमतीने आणि गावातील लोकांना न जुमानता बाबू भिल्लाशी निःसंकोच लग्न लावले होते) सात ऑगस्ट रोजी पुन्हा डी. एस. पी. साहेबांचेकडे अर्ज केला. त्यामध्ये पुढील प्रमाणे बाबी होत्या. सामाजिक बहिष्कार, मुलांना शाळेमधे बसू देत नाहीत, पिण्याचे पाणी भरू देत नाहीत. या सर्व

बाबींचे स्पष्टीकरण त्यामध्ये केले होते.

परिस्थिती दिवसेंदिवस तंग होत गेली. उपासमारीची पाळी सुरू झाली. बीडचे डी. एस. पी. आणि चकलंवा पोलिस स्टेशनचे पी. एस. आय. मुळीच लक्ष घालीत नव्हते. उलट बंदोबस्तासाठी ठेवलेले पोलीस सवर्ण गावकऱ्यांच्या बाजूने या स्त्रियांना त्रास देवू लागले. या सर्व प्रकाराला कंटाळून बाबू भिल्लाने वसंतरावजी नाईक यांना एक निवेदन पाठविले आहे. त्यामध्ये प्रथमपासून घडलेल्या हकिगती तारखांसह दिल्या होत्या.

डी. एस. पी. ला अर्ज दिलेल्या शंकर मणाजी शिंदे (भिल्ल) याचे घर गावातील लोकांनी जाळून टाकले. दुसऱ्या दिवशी ताबडतोब नेमाजी चांभाराचेही घर या लोकांनी जाळले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत अर्ज जाऊनही महाराष्ट्र शासनाला अथवा पोलीस खात्याला मात्र घाम फुटलेला नाही. उलट अन्याय सहन करणारे अत्याचाराचे आणि बहिष्काराचे प्रहार सोसून बिचारे अन्नअन्न करून देशोधडीस लागले. उलट गावकरी काही राजकीय नेत्यांच्या सल्ल्याने या सर्व लोकांना हद्दपार कसे करता येईल या कागदपत्रांच्या तयारीमध्ये होते. या हरामखोरांना पाठिशी घालणाऱ्यांची पाठ मऊ करणारे कोणी नव्हते. बाबूने नंतर एक स्मरणपत्र देखील दिले होते परंतु महाराष्ट्र शासनाच्या शिरस्त्याप्रमाणे त्याचेही काही झाले नाही.

बाबूने चौकशी केली त्यावेळी समजले, की काही राजकीय पुढाऱ्यांच्या बरोबर गावकरी डी. एस. पी. साहेबांना भेटले आणि त्यांनी सांगितले, की हे भिल्ल आणि हरिजन गुंड आहेत. हे सर्व एकमताने गावामध्ये चोऱ्या करसात. या सर्वांची नीतिमत्ता बिलकूल चांगली नाही. यांचा गावकऱ्यांनी आजपर्यंत खूपच त्रास सहन केलेला आहे. त्यांना गावामध्ये राहू देवू नये. त्यांना गावामधून हद्दपार करावे. त्यांच्या त्रासांना कंटाळून आम्ही त्यांच्याबरोबर ज्या प्रकाराने वागत आहोत तो प्रकार योग्य आहे. अशाप्रकारे सांगितल्यानंतर डी. एस. पी. साहेबांची या प्रकरणाकडे पाहण्याची दृष्टीच एकदम बदलली. कारण या लोकांचे बरोबर काही राजकीय पुढारी होते आणि भिल्ल या जमातीकडे पहाताना पोलीस खात्याचा दृष्टिकोन हा अगदी वेगळाच असतो. भिल्ल म्हणजे एक चोरी करणारी जमात हा शिक्काच त्यांचेवर लावला जातो. परंतु बाबू भिल्ल हा एक सुशिक्षित दलित नेता आहे. जो आपल्या शेतीमधून राबून आपली उपजीविका करतो. आणि वेळ पडली तर दुसऱ्याच्याही शेतामधे काम करतो.

दोन महिन्यापूर्वीची हकीगत. सव्वीस मार्चला भीमाशंकर भील्ल (ज्याला गावकऱ्यांनी या सर्व दलित कुटुंबा बरोबर हद्दपार केले होते) गावामध्ये घर बांधावयास आला. त्याला वाटले गावकऱ्यांच्या मनांतील राग आता नाहीसा झाला असेल. मनामधील आढ्या आता निघाल्या असतील. आपण हव

तर कमीपणा घेऊन त्यांच्यामध्ये मिसळून जाऊ या. आपणावर झालेले अन्याय आणि अत्याचार विसरून जावू या. भीमा गावामधे आला ही खबर गावकऱ्यांना समजताच सर्वजणांनी एकत्र येवून त्याला ग्रामपंचायतीमध्ये बांधले आणि अक्षरश: लाथांनी मारले. त्यावेळी एका गावामधील गृहस्थाचाच बकरा त्यांनी विकत घेतला आणि त्याचेसमोर कापून, त्याला बांधलेल्या स्थितीत पंचायतीमध्ये ठेवून, बकरा विकत घेतलेल्या त्या गृहस्थासह बकरा चोरीची कंप्लेट देण्यासाठी ते पोलीस स्टेशनला स्टेशनला गेले. त्यावेळी पी. एस. आय. समोर जबाब देताना बकऱ्याचा मालक भितीमुळे खरी हकीगत सांगून गेला. त्यावेळी मात्र त्या पी. एस. आय. ला ही खरी घटना उकलली, की यामध्ये या मागासवर्गीयांचा काहीएक दोष नाही. हा सर्व दोष या सवर्णांचा आहे.

रात्री हे खोटे फिर्यादी पुन्हा गावामध्ये आले. त्यावेळीमात्र भीमा माराच्या भीतीमुळे कसेबसे दोरांचे बंधन सोडून पळून गेला होता. त्यांनी आपला मोर्चा तसाच बाबूच्या पत्नीकडे वळविला आणि तिला भीमाबद्दल विचारले. तिने माहीत नाही असे म्हणताच या गावगुंडांनी तिलाही वेतांच्या फोकाने मारले आणि असेही उद्‌गार काढले, की यावेळी तुझी मुलगी (जिला तरुण वयाच्या भितीमुळे तुळसाबाईने आपल्या नातेवाईकाकडे ठेवले होते.) असती तर तिलासुद्धा दाखवले वसते. फक्त मारून हे लोक थांबले नाहीत तर घरामध्ये असलेली भांडीही त्यांनी नेली. आम्ही ज्यावेळी त्याघरी गेलो होतो त्यावेळी बाबूची ती वस्त्रहीन मुले मिठामध्ये शिजवलेले चिंचोके खात होती. त्या घरामध्ये तुळचांवर लिहिले होते की 'देव तारी त्याला कोण मारी' आणि 'सत्याचा विजय असतो' भिंतीला महात्मा गांधी आणि पंडित नेहरू यांचे फोटो लटकत होते.

पोलिसखाते न्यायासाठी सत्याच्या बाजूने असते. फक्त शोभेसाठीच असे म्हणावे लागेल. या प्रकरणामध्ये ब्राह्मणगाव आणि घाटनांद्राची पुनरावृत्ती व्हावी याची सरकार वाट पहाते आहे काय? ब्राह्मणगावामुळे शासनाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेतच. याही प्रकरणात असे होऊ नये. म्हणून महाराष्ट्र शासनाने या प्रकरणाकडे लक्ष घालावे असे मी विनंतीपूर्वक आवाहन करतो.

● ● ●

# शहादे आघाडीवरून मी अशोक मनोहर लिहितो....

तळोदे तालुक्यात तळोद्यापासून चार ते पाच मैल अंतरावर अडीच-तीन हजार वस्तीचे प्रतापपूर नावाचे एक मोठे गाव आहे. ह्या गावात हरिजन, कोळी, आदिवासी व रजपूत अशा लोकांची वस्ती आहे. रजपूत लोक श्रीमंत व जमीन मालक आहेत. अर्थातच गावातील सरपंच, पोलीस पाटील हे सरकारी यंत्रणेचे दुवे रजपूतच आहेत. ह्या गावात ५ मे १९७३ रोजी एक महत्वाची घटना घडली. गावातील गुरे राखणारा एक मुलगा जत्रेला जाण्यासाठी लागणारे पैसे मागण्यासाठी सरपंचाच्या घरी गेला. त्याचे चार महिन्यांचे पैसे बाकी होते. हा आदिवासी माणूस पैसे मागायला जाताच त्याला सरपंचानी मारहाण करण्यास सुरुवात केली. ते बघून त्याची पत्नी व बहीण मध्ये पडली. त्यावेळेस त्यांनासुद्धा मारहाण करून त्यांचे लुगडे सोडून दिले गेले. हा तमाशा चालू असतानाच अर्थातच सारे भिल्ल लोक घाबरून तेथे गोळा झाले. मग रजपूत लोकही सरपंचाच्या घरच्या धाब्यावर चढले व त्यांनी दगडफेक सुरू केली. पोलीस पाटील स्वत: धाब्यावर बंदूक घेऊन उभा होता व ती रोखून दम देत होता. इतक्यात धाब्यावरून एक माणूस खाली पडला व त्याचे दात पडले. थोड्याच वेळात भिल्ल लोक आपल्या भिलवाड्यात परत गेले. ही घटना घडल्यावर दुसरे दिवशी अकरा भिल्लांना पकडून नेण्यात आले. त्यात मारहाण झालेल्या दोन बाया व तो माणूस होता. तारीख अकरा रोजी मी स्वत: घटनास्थळी गेलो. सकाळी प्रतापपूर येथे उतरलो तर मला समजले, की गेले सहा दिवस हे भिल्ल लोक भयभीत होऊन जवळच्याच एका शेतात गावातून आपापली घरेदारे असतील त्या स्थितीत सोडून राहिलेले आहेत. मी तेथे गेलो. जवळ जवळ साडेतीनशे लोक सोसाट्याच्या वाऱ्यात व कडक उन्हात आपापले नसलेले संसार मांडून बसलेले

आहेत. मी त्यांची चौकशी केली. मग दुपारी तळोदा येथे जाऊन फौजदाराला भेटून त्यांनी केलेल्या तक्रारीचे काय झाले ते व मामलेदारांना भेटून त्यांच्या अन्नधान्यासाठी काय करायचे ते, विचारण्यासाठी निघालो. आणि येथूनच पुढे खरे रामायण सुरू झाले. त्यातूनच पुढे पोलीसखाते, सरकारी यंत्रणा, निवडून आलेले आमदार यांना ह्या गरीब आदिवासींची किती काळजी आहे ते स्पष्ट होत गेले.

तळोद्याकडे जात असताना वाटेतच एक जीप येताना दिसली. मी जीप थांबवली. आतमध्ये तळोद्याचे फौजदार चंद्रात्रेय, सर्कल इन्स्पेक्टर साकटकर व त्या भागातून निवडून आलेले आमदार दिलवरसिंग पाडवी अशी बडी मंडळी बसलेली होती. मी सर्कल इन्स्पेक्टर ह्यांना विचारले, 'प्रतापपूरच्या रजपूतांच्या विरूद्ध ६ तारखेला फिर्याद दाखल केली आहे, आज ११ तारीख असून काहीच कारवाई का झाली नाही?'

त्यांचे उत्तर, 'चौकशी चालू आहे.'

मी : आदिवासींना मात्र ताबडतोब अटक झाली. त्यांच्या चौकशीला काहीच वेळ लागला नाही.

तो : अहो कलमे वेगळी वेगळी असतात.

मी : ठीक आहे, आपली चौकशी सावकाश चालू द्या. पण जोपर्यंत त्यांना अटक होत नाही तोपर्यंत हे लोक घाबरलेले आहेत. ते गावात यायला तयार नाहीत.

तो : आम्ही आता चौकशीला चाललो आहोत. तुम्ही पण चला.

मी : मी इकडे थांबलो आहे. तिकडे गावात मी येणार नाही. तुमची तिकडली चौकशी झाल्यावर जमल्यास इकडे या.

तो : अहो, तुम्ही पण चला, आपण ग्रामपंचायतीत बसू. ती तर सार्वजनिक जागा आहे.

मी गाडीत बसलो. गाडी ग्रामपंचायतीत आली. तेथे मोठा पोलीस बंदोबस्त होता. आम्ही आत जाऊन बसलो. इकडून बोलावण्याचा निरोप आला. आम्ही वाट पहात होतो, तोच एक माणूस आला.

'चला साहेब, तिकडे आमराईत उत्कृष्ठ व्यवस्था केली आहे. खुर्च्या वगैरे टाकल्या आहेत. हवा पण छान येते तिकडेच बसू या.'

माझे डोके तापू लागले होते. आमदारांनी सांगितले, 'अशावेळी खरी चौकशी करायची तर ग्रामपंचायतीसारख्या सार्वजनिक ठिकाणीच झाली पाहिजे.' पण नंतर ते पाच मिनिटे स्वस्थ बसले. मी काहीच बोलत नाही असे पाहून सर्कल इन्स्पेक्टर व आमदार उठले व तिकडे जाण्यास निघाले. आता मात्र मला राग आवरणे शक्य नव्हते. मी ताडकन् उठलो व जिकडे गरिबांनी तळ ठोकला होता तेथे जाऊ लागलो. माझ्या मागोमाग फौजदार व एक गुप्त पोलीस अधिकारी आले व मला विनवणी करू लागले, 'तुम्ही पाहिजे तर तिकडे जाऊ नका ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये बसून रहा.' मी त्यांना बजावले,

ठीक आहे, मी थोडा वेळ वाट पाहीन.'

मग मी ग्रामपंचायतीत बसून राहिलो. विचार करत होतो. स्वतंत्र भारत वर्षात खरोखरच गरिबांना कधी न्याय मिळणार आहे का? ह्या सरकारी यंत्रणेतील पोलिस अधिकारी कधीतरी मालदारांशी ताठरपणे वागून खरी बाजू समजून घेणार आहेत का? हे अधिकारी आपली सारी लाज गुंडाळून ठेवून दहा मिनिटापूर्वी दिलेले आश्वासन मालदारांच्या एका वाक्यासरशी धुडकावून लावून गरिबांचा अपमान करण्याचे सोडून देणार आहेत का? गरिबांच्याच मतावर निवडून गेलेले हे आमदार लोक चौकशीचा फार्स कशासाठी करतात? ह्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करून मगच आम्हाला Constructive work करायला सांगणाऱ्यांनी आपले तोंड उघडावे.

थोड्या वेळाने बाहेर जीपपाशी बोलणे चालू असलेले ऐकले. ते लोक आमदार, फौजदार व सर्कल इन्स्पेक्टर ह्यांच्यापाशी आम्हा कार्यकर्त्यांची बदनामी करत होते. आम्ही आदिवासी गरीब लोकांना दारू पिऊन आगी लावायला शिकवतो असा स्पष्ट आरोप ते करत होते. मी माझा राग काबूत ठेवत होतो.

मग त्यांना घेऊन मी शेतात आलो. जीप लांबवर थांबवून सारेजण मांडवाकडे निघालो. खाटेवर बसलो. बाया व पुरुष घाबरून लांबच उभे होते. मी त्यांना समोर बसवून घेतले. मग आमदारांनी चवकशीस सुरुवात केली. लोकांनी कळवळून घडलेली हकीकत सांगितली. बाया कशी मारहाण झाली ते सांगत होत्या. सर्कल इन्स्पेक्टरांना मी मराठीतून त्याचा अर्थ सांगत होतो. त्यांनी विचारले– ह्यांनी फिर्याद दाखल केली आहे का? मी म्हणालो होय, ६ तारखेला केली आहे. अजून चौकशी चालू आहे. फौजदार म्हणाले, ह्यांची तक्रार उशीरा आली आहे. अजून मेडिकल रिपोर्ट आलेले नाहीत, त्यामुळें काही करता येत नाही. मग जरा वेळ आणखीन काही लोकांचे जाब जबाब झाले. मी सर्कल इन्स्पेक्टरांना निक्षून सांगितले, तुम्ही चौकशी काय करावयाची असेल ती करा पण ह्या लोकांची भिती घालवायची असेल तर त्यांना अटक होणे आवश्यक आहे.

हे चालू असताना तिकडे दुसरी जीप येताना दिसली. ही जीपही अर्थातच आधी प्रतापपूरला जाऊन आली होती. लोकांचे सारे लक्ष तिकडे लागले. जीप थांबली. दोन साध्या वेषातील माणसे उतरली व इकडे येऊ लागली. फौजदार आणि सर्कल इन्स्पेक्टर तिकडे पळाले. त्यांना मध्येच अडवून सॅल्यूट झाला. मग दहा मिनटे हितगुज झाले. ते दोघे म्हणजे धुळ्याचे कलेक्टर माखीजा व डी. एस. पी. रामन हे होते. ते आले, खाटेवर बसले. माझ्या शेजारी आमदार दिलवरसिंग पाडवी बसले होते. त्यांच्याशी शेकहँड झाला. हसत हसत विदेशी स्टायलीत विचारपूस झाली. समोर पंचवीस वर्षे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी धडपडणारे स्वतंत्र

भारताचे गरीब, दुबळे दोन दिवस अक्षरश: उपाशी असे, भयभीत नजरेने हे दृश्य पहाणारे साडेतीनशे लोक बसले होते.

कलेक्टरांनी बोलण्यास सुरुवात केली. आमदार साहेब, तुम्ही चौकशी केलीच असेल. मग काय तुम्हाला काय वाटते परिस्थितीबद्दल ?

आमदार : मी सारी चौकशी केली. एकंदरीत असे दिसते की ह्या लोकांनी आपले म्हणणे नीट मांडले नाही व पोलिसांकडून नीट चौकशी झाली नाही ......वगैरे वगैरे.

मला त्यांच्या ह्या गुळमुळीत व आमदारी भाषेचा राग आला. मी मध्येच बोललो–

कलेक्टरसाहेब तुम्ही माहिती त्यांना काय विचारताय ? ते तुमच्या सारखेच फक्त तुमच्या आधी दोन तास इथे आले आहेत. मला ती माहिती सांगण्याचा अधिक अधिकार आहे.

कलेक्टर : ठीक आहे, तुम्ही सांगा.

मी बोलू लागलो. पाच तारखेला दंगल झाल्यानंतर गावात दवंडी देण्यात आली, की जो कोणी गावातील आदिवासींना धान्य अगर पाणी देईल त्याला ५१ रु. दंड करण्यात येईल. गावाच्या मंदिरात एका लंगडया इसमाला बसवण्यात आले आहे. त्याच्या जवळ नगारा दिला आहे व त्याला सांगण्यात आले आहे, की कोणीही आदिवासी गावात येताना दिसला तर नगारा वाजव म्हणजे आम्ही सारे गोळा होऊ. त्यामुळे हे लोक इतके घाबरले आहेत, की त्या दिवसापासून तीन दिवस त्यांच्या घरी असलेली भांडीकुंडी आणायलासुद्धा ते घरी जाऊ धजले नाहीत. शेवटी फौजदार स्वत: त्यांच्या बरोबर गेले तेव्हाच ते गावात गेले.

कलेक्टर : मग काय त्यावेळी नगारे वाजले काय ?

आता मात्र कमाल झाली, एक कलेक्टरसारख्या हुद्यावर असलेला माणूस, मोठी दंगल झालेल्या ठिकाणी चौकशी करायला आलेला आहे. एक कार्यकर्ता कळवळीने काय घडले ते सांगत आहे व हा माणूस उपरोधिकपणाने विनोद करतोय !

मी भयंकर संतापलो. कलेक्टर तुम्ही तुमची जबाबदारी सोडून बोलत आहात. माझ्या संतापाला पाणी घालत आहात. हा प्रश्न विचारताना तुम्ही जरा तरी विचार करायला हवा होतात. जर उद्या शासनाचा प्रतिनिधी असलेला फौजदार बरोबर असतानासुद्धा नगारे वाजवावे अशी तुमची अपेक्षा असेल तर मी म्हणेन तुम्ही मूर्ख आहात. मग शासन कुणाचे आहे हे तुम्हीच ठरवा आणि तुम्ही जर सारे काही असेच चेष्टेवारी नेणार असला तर मला काहीच बोलायचे नाही.

थोडा वेळ स्तब्धता पसरली, मी शांत झालो व परत बोलायला सुरुवात केली. स्वत: फौजदार बरोबर असताना सुद्धा त्यांनी ह्या लोकांना दम दिला व फौजदार गप्प बसले. अशा परिस्थितीत जर तुम्हाला खरोखर या लोकांच्या बद्दल काही कळवळ असेल, जर तूम्ही

यांच्यासाठी काही करू इच्छित असाल तर त्या लोकांना अटक करा व ह्यांच्या मनातील भिती दूर करा, तरच हे गावात परत जायला धजतील.

डी. एस. पी. रामन बोलू लागले, 'अशोकभाई, आम्ही आता जरा त्या लोकांशी बोलू का ? त्यांना प्रत्यक्ष काय घडले ते विचारतो !

मी म्हणालो, ठीक आहे पण तुम्हाला एक बजावून ठेवतो, ते बोलत असताना त्यांना तुम्ही क्रॉस करण्याचे काहीच कारण नाही. एकतर ते लोक मुळातच अडाणी भित्रे असतात व त्यातून आज त्यांच्यावर जीवन मरणाचा प्रसंग गुदरला आहे, तेव्हा तुम्ही तसे करणे म्हणजे त्यांच्यावर दडपण आणणेच आहे. मी ते चालू देणार नाही.

डी. एस. पी. म्हणाले, ठीक आहे तुमचे म्हणजे कबूल आहे.

मग प्रथम एक दोघा पुरुषांनी हकीकत सांगितली त्यावेळेसही डी. एस. पी. मध्ये बोलले पण मी काही हरकत घेतली नाही. नंतर ज्या मुलाला मारहाण झाली त्याची बायको बोलायला उभी राहिली. तिने हकीकत सांगण्यास सुरुवात करताच डी. एस. पी. म्हणाले,

'पण तुझा नवरा दारू पिऊन गेला होताना ?'

हे पहा. असे हे जबाबदार डी. एस. पी. साहेब चौकशीसाठी म्हणून आलेले आणि असे उलट प्रश्न विचारून दडपण आणायला तयार. वर मला कबूल केले होते की मी बोलणार नाही. माझ्या सहनशक्तीची परिक्षाच पहायला आलेले. मी उभा राहिलो–

श्रीयुत रामन तुमच्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्याला साध्या गोष्टी समजत नाहीत काहो ? मी तुम्हाला प्रथमच सांगितले, तुम्ही उलट तपासणी घेऊ नका. तुम्हाला एकदम काय सणक आली ? कोणी सांगितले की दारू प्यायला होता ?

ते बोलून गेले, 'आम्ही त्या लोकांच्याकडे चौकशी केली. त्यांनी तसे सांगितले होते.'

ह्या शासन यंत्रणेतील महत्त्वाचे असे जे पोलीस खाते त्यांची ही वागण्याची रीत पहा, ज्यांनी बंदुकीने धाक दाखवून पैशाच्या पाठबळावर गावातील गरिबांना हुसकावून लावले, मारहाण करून वर त्यांनाच अटकेत ठेवायला भाग पाडले, त्यांचेकडे हे अधिकारी आधी जाऊन येतात, त्यांच्याशी गप्पागोष्टी करतात. त्यांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवतात व त्यांच्यावर मारहाणीचे आरोप ठेवणाऱ्या गरिबांची जबानी घेताना, त्या माहितीवर आधारीत उलट प्रश्न विचारून दडपण आणतात आणि ह्या पार्श्वभूमिवर आम्ही जाहीर सभेत पोलीस खात्यावर आरोप करताच हेच अधिकारी आम्हाला कायद्याचे ज्ञान कमी आहे, अशा अर्थाची उद्धट पत्रे पाठवतात. गरिबांना चांगले दिवस यावे म्हणून धडपडणाऱ्या आम्हा कार्यकर्त्यांवर भलभलते आरोप करून आम्हाला उपदेशाचे डोस पाजणाऱ्यांनी ही परिस्थिती समजावून घेतली घेतली तर फार बरे होईल.

बाई पुढें बोलू लागली; ' साहेब मी गाईवर हात ठेवून सांगते माझा नवरा आयुष्यात कधीच दारू प्याला नाही आणि त्या दिवशीही प्याला नव्हता. '

मग आणखी काही लोकांनी हकीकती सांगितल्या. सुदैवाने डी. एस. पी. गप्प बसले होते. एवढे झाल्यावर कलेक्टर म्हणाले, ' बरे तुमच्या आणखी काही पोलीस वगैरेंच्याबद्दल तक्रारी आहेत का ?'

डी. एस. पी. रामन म्हणाले, ' These people always have complaints about everybody. ' आणि हसत हसत त्यांनी आमदारांच्याकडे पाहिले.

मी आता फार झाले असे म्हणून उभा राहिलो, ' हे पहा रामन तुमची अशी समजूत असेल, की मला इंग्रजी कळत नाही तर ती चुकीची आहे. तुम्ही काय म्हणालात ते मला समजले आहे. आज लोक येथे उपासमारीने बेशुद्ध पडत आहेत. त्यांची चौकशी करण्यासाठी तुम्ही आलेले आहात, लोक तळमळीने तुमच्यावर विश्वास ठेवून काही सांगत आहेत आणि तुम्ही त्यांची टिंगल करून हसत आहात ! तुम्हाला जरासुद्धा लाज वाटत नाही का ? तसे असेल तर बंद करा हा फार्स. आपल्या गाडीत बसा आणि निघून जा. काही गरज नाही तुमच्या चौकशीची.

कलेक्टरनी मला शांत होण्यास सांगितले. मी खाली बसलो. नशीब त्यांचे, मी त्यांना मारले नाही. हजारो शिव्या तोंडात येऊन देखील गप्प बसलो. कारण उघड आहे, मी काही सरकारी अधिकारी अगर आमदार नाही. गरिबांची संघटना बांधून त्यांना बरे दिवस आणण्याची स्वप्ने पहाणारा तरूण आहे. माझ्या तोंडून एखादा जरी गैर शब्द गेला, तरी त्याचे भांडवल करून माझ्या लोकांना त्रास द्यायला हे टपलेलेच आहेत.

मग मी कलेक्टरना विचारले,' माझ्या काही मूलभूत शंका आहेत. त्याबद्दल तुम्हाला काही सांगता आले तर बघा. '

ते म्हणाले,' विचारा, जरून विचारा.'

मी : जेव्हा एखाद्यावर आरोप असतो तेव्हा त्याला अटक करण्यासाठी पोलीस जातात. त्यांच्याबरोबर फिर्यादी पक्षाचे लोक असावेत काय ?

कलेक्टर : अर्थातच नाही.

मी : मग आदिवासींना पकडले तेव्हा ते लोक त्यांच्याबरोबर होते ते लक्षात ठेवा. आरोपीला पकडण्यापूर्वी त्याची चौकशी होते असे तुम्ही म्हणता. त्याप्रमाणे ११ पैकी एकही आदिवासीची चौकशी झाली नाही आणि आज मात्र त्या लोकांच्या घरी जाऊन अर्धा तास त्यांच्याबरोबर सर्कल इन्स्पेक्टर व इतर अधिकारी गप्पा मारून आले. तेसुद्धा त्यांच्या सांगण्यावरून ग्रामपंचायतीत न बसता त्या लोकांच्या घरी जाऊन, ही गोष्ट लक्षात ठेवा.

गावाच्या तोंडाशीच दहा पोलीस व फौजदार हत्यारानिशी बसले आहेत, ते गावातील लोकांच्या संरक्षणासाठी आणि त्याचवेळी हे लोक इकडे उघड्यावर पडलेले असताना येथे त्यांना कोणतेही संरक्षण नाही. ह्याचे दोन तीन स्पष्ट अर्थ होतात. एक तर पोलीस खाते गरिबांच्या जिवाचे संरक्षण

करण्यासाठी नसते तर बडयांच्या माल-मत्तेचे संरक्षण करण्यासाठी असते. एकतर हे गरीबच गावावर हल्ला करणार आहेत असे गृहीत धरले आहे. नाहीतर सरळ सरळ त्या लोकांकडून पोलीस खात्याने पैसे खाल्ले आहेत. शेवटी एक प्रश्न उरतो की मग ह्या लोकांची भिती घालवण्यासाठी त्यांना अटक करणार आहात का ? आणि या लोकांना खाण्यासाठी सरकार काही देणार आहे काय ?

कलेक्टर : ह्या लोकांनी परत गावात जावे म्हणजे त्यांना कामावर जाता येईल व खायाला मिळू लागेल.

मी : हे बघा तुम्ही परत आडमुठे-पणा करू नका, हे इथे आले आहेत ते काही Holiday Camp म्हणून नव्हे तर त्यांना गावातून हाकून लावले आहे म्हणून, तेव्हा जोपर्यंत गावात ते लोक मोकळे हिंडत, प्रत्यक्ष फौजदारादेखत दम देत आहेत, तोपर्यंत ते लोक परत जाणार नाहीत आणि त्यांना तसे सांगणे मूर्खपणाचे आहे.

कलेक्टर : बघा आमदारसाहेब, तुम्ही सांगून बघा. तुम्ही त्यांचे प्रतिनिधी आहात, त्यांच्या जमातीतील आहात. तुमचे ते ऐकतील.

इतक्यात एक म्हातारा, म्हणाला, हे काय आमचे नाहीत. निवडणुकीपुरते येतात, मग परत तोंड दाखवत नाहीत. आम्ही त्यांचे ऐकणार नाही.

सावधान ! आमदारांनो सावधान ! गरीब आता शहाणा होत आहे. त्याच्या जखमेवर मीठ चोळून अपमान करून घ्याल ? मग कलेक्टरांनी भाषण ठोकले, खूप कळवळा आल्यासारखे बोलले. माझ्यावर विश्वास ठेवा असे सारखे म्हणत होते. पोलीस संरक्षण देतो म्हणून सांगत होते. काम देतो म्हणून सांगत होते. मग लोकांनी एकेका प्रश्नांची सरबती सुरू केली. आम्हाला हत्यार नाहीत, धान्य महाग असते वगैरे वगैरे. कलेक्टर भांबावून गेले आणि म्हणाले.

हे बघा तुम्ही प्रश्नच फार विचा-रता. जरा मला बोलू द्या. मी म्हणालो, थांबा, बोलू द्या त्यांना. आपण या जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी आहात. जरा त्यांचे सारे प्रश्न ऐकून घ्या. सोडवायचे का नाही ते नंतर बघा !

शेवटी कलेक्टरांनी हात जोडले व म्हणाले; ' माझे ऐकून तरी तुम्ही आज गावात चला. '

साऱ्यांनी एका आवाजात सांगितले, आमचा तुमच्यावर विश्वास नाही. त्यांना अटक झाल्याशिवाय आम्ही गावात पाऊल टाकणार नाही,

सारी फौज उठली व चालू लागली. जाताना संरक्षणासाठी चार पोलीस ठेवून गेले.

प्रसंग नुसता गंमत म्हणून टाकू नका. ह्या साऱ्या संभाषणात फार काही दडलेले आहे. ह्यातून काही शिकलात, विचार केलात, चीड आली तरच ह्या साऱ्या लिहिण्याचे सार्थक आहे. दुर्दैवाने जवळ टेप रेकार्डर नव्हता. कारण मला माहित आहे, हे निर्लज्ज लोक नंतर म्हणणार आहेत, ही अतिशयोक्ती आहे. मला त्याचेशी काहीच कर्तव्य नाही. घडले ते सारे शब्दांकित करताना शब्द अगर क्रम मागे पुढे असेल, पण मति-तार्थ बदलत नाही. ● ● ●

पुस्तके

# नवा दृष्टिकोन नसलेला शिक्षणविषयक ग्रंथ

अरविंद वैद्य

प्राचार्य श्रीकृष्ण लक्ष्मण पांढरीपांडे यांचा १९२१ सालापासून शिक्षण-क्षेत्राशी संबंध आहे. माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य, नागपूर शिक्षण मंडळाचे संस्थापक सदस्य, सहकार्यवाह, उपाध्यक्ष व पुढे मध्य प्रांतांतील सरकारमान्य शिक्षण संस्था-संघाचे अध्यक्ष असा नानाविध प्रकारचा हा संबंध आहे. या दीर्घ काळात त्यांना जे अनुभव आले त्यांच्या आधाराने भारतातील उच्च शिक्षणाची सर्वांगीण चर्चा त्यांनी 'भारतीय उच्च शिक्षण : कसे आहे ? असे असावे ?' या आपल्या पुस्तकात केली आहे.

पुस्तकाच्या नावात दर्शविल्याप्रमाणे या चर्चेचे दोन स्पष्ट भाग आपल्याला प्रथम खंड व द्वितीय खंड यामध्ये दिसतात. भारतातील सध्याची शैक्षणिक परिस्थिती समाधानकारक आहे असे कोणीही म्हणणार नाही. असंतोषाची कारणे या प्रथम खंडामध्ये श्री. पांढरीपांडे यांनी शिक्षण पद्धतीतील दोषांची चर्चा केली आहे; आणि ते दोष घालवण्यासाठी उपाय योजनाही सुचविली आहे. शिक्षणपद्धतीची पुनर्रचना या द्वितीय खंडामध्ये संपूर्ण पुनर्रचनेचा विचार त्यांनी केला आहे.

अशा तऱ्हेची वैचारिक पुस्तके आणि इतर ललित कृती यांच्या मूल्यमापनात मूलभूत फरक आहे. शिक्षण क्षेत्र हे सारखे बदलत असते किंवा बदलणे हा त्याचा आवश्यक गुण आहे. म्हणूनच शिक्षणाला तत्वज्ञानाची बदलणारी बाजू असे म्हणतात. त्यामुळे अशा क्षेत्रांमध्ये सतत संशोधन चालू असते व प्रयोग केले जातात. जेव्हा एखादे नवीन पुस्तक अशा विषयावर लिहिले जाते तेव्हा त्या पुस्तकाच्या अगोदर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या संदर्भातच त्याचा विचार करावा लागतो. मागील अभ्यासांच्या आधारावर मागील चर्चेपेक्षा जर काही वेगळा नवा विचार नवीन पुस्तकात

केला असेल तर अशा पुस्तकांना काही महत्व आहे, नाहीतर केवळ जुन्या संख्येत नवीन भर एवढाच त्याचा अर्थ होतो. श्री. पांढरीपांडे यांच्या प्रस्तुत पुस्तकापूर्वी मुधलियार आयोग, राधाकृष्णन आयोग, कोठारी आयोग आदि आयोगांनी आपल्या अहवालांमध्ये नवीन विचार मांडले आहेत आणि श्री. पांढरीपांडे यांच्या पुस्तकाचा विचार त्या अहवालांच्या संदर्भात होणे आवश्यक आहे. वरील आयोगांनी व्यक्त केलेल्या मतांपेक्षा काही वेगळी महत्वपूर्ण मते पांढरीपांडे यांनी व्यक्त केली आहेत काय ? त्याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल.

सध्याच्या महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीत परीक्षेत यशापयश, द्रव्यार्जन–क्षमता, सद्-वर्तन व शिस्त, धर्मशिक्षण, शारीरिक शिक्षण व आरोग्य आदि मुद्यांच्या आधारांनी श्री. पांढरीपांडे यांनी अनेक दोष दाखविले आहेत. ते सर्व दोष वरील आयोगांनी दर्शविलेले होते. फक्त त्यांचे संकलन पांढरीपांडे यांनी केल्यासारखे वाटते.

परीक्षेतील यशापयशाचा विचार करताना आजकाल परीक्षांमधून फारच विद्यार्थी अयशस्वी होतात इकडे लक्ष वेधून त्यांनी परीक्षा प्रश्नपत्रिकेतील दोष, सदोष अभ्यासक्रम, सदोष अध्यापन आदि मुद्यांचा विचार केला आहे. परंतु विद्यार्थी व शिक्षण संस्था हे ज्या समाजाचे घटक आहेत त्या समाजाचा विचार त्यांनी केलेला दिसत नाही. विद्यार्थी, पालक, शिक्षक, समाजनेते हे जे संबंधित घटक त्यांना विद्यार्थ्यांच्या अपयशामुळे दुःख होते, ते प्रक्षुब्ध बनतात, तेव्हा अधिक विद्यार्थी पास होतील अशा परीक्षा घेतल्या जाव्यात, असे ते म्हणतात. परंतु सध्या जे विषय शिकविले जातात, ज्या पद्धतीने शिकविले जातात, त्यातून हीच परीक्षापद्धती संभवते. शिवाय वरील घटकांची शिक्षणाकडे पाहाण्याची दृष्टी शास्त्रीय व योग्य आहे का, हाही वादग्रस्त प्रश्न आहे. याचाही विचार करायला पाहिजे होता.

‘ विद्या अर्थकरी असली पाहिजे ही इच्छा व अपेक्षा सर्वसामान्य आहे. ती आज पूर्ण होत नाही ’ हा पांढरीपांडे यांचा दुसरा मुद्दा. वरील अपेक्षा पूर्ण करण्यासाठी स्पर्धा कमी करणे, नोकऱ्यांची संख्या वाढविणे, धंदेशिक्षण, उच्च शिक्षणात व्यवसायाला स्थान, लघुव्यवसाय प्रदर्शिनी आणि मार्गदर्शन आदि उपाय त्यांनी सुचविले आहेत. हे सारे उपाय थोड्याबहुत फरकांनी यापूर्वीही सुचविले गेलेले आहेत. पण तरीही श्री. पांढरीपांडे यांनी त्याची मांडणी चांगली केली आहे. परंतु इथेही समाजरचनेचा प्रश्न येतो. आपल्या देशात शिक्षण क्षेत्रासकट सगळ्या गोष्टींचा विचार बनिया पद्धतीने नफ्यातोटयाच्या ताळेबंदीत केला जातो. संपूर्ण समाजाच्या उत्थानाला जी शास्त्रीय बैठक लागते ती क्वचितच जाणवते. समाजातील सर्व शारीरिक आणि बौद्धिक शक्ती योजनापूर्वक राबवणे हा बेकारी निर्मूलनावर उपाय

असतो याचा विचार करणे आवश्यक आहे.

सद्वर्तन व शिस्त याचा पांढरपांडे यांनी केलेला विचार तर सरळ सरळ प्रतिगामी असा आहे. यंत्रयुगामुळे ढासळलेली जुनी मूल्ये आणि युवकांच्या मनात निर्माण झालेली पोकळी ही आजच्या बेशिस्तीची कारणे आहेत. जुनी मूल्ये पुन्हा निर्माण करणे शक्य नाही. तेव्हा समाजनेत्यांनी युवकशक्तीला नवीन, योग्य मार्ग दिले पाहिजेत हा वास्तविक वाजवी विचार तर त्या ऐवजी अज्ञान, कामक्रोध कुसंगती, अनास्था वगैरे कारणे त्यांनी दाखविली आहेत.

'विद्यार्थीवर्ग विद्यार्थी या नात्याने आंदोलनात ओढला जात नाही, तर तरुण वर्ग एकत्र आलेला असतो, त्यामुळे ती ठिकाणे गवताच्या गंजीप्रमाणे ठिणगी टाकायला सोयीस्कर असतात.' असे प्रतिपादन करून राजकीय पक्षांवर पांढरीपांडे यांनी राळ उडवली आहे. वास्तविक विद्यार्थीवर्ग व तरुणवर्ग हा फरक करणे हे अशास्त्रीय आहे. आणि विद्यार्थी व राजकारण यांचा संबंध कोणता असावा हा प्रश्नही तसा वादग्रस्त नाही. पांढरीपांडे यांनी ज्या विद्यार्थ्यांचा विचार केला आहे ते विद्यार्थी सोळा ते तीस या वयोमर्यादेत येतात आणि त्यातील अनेकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला असतो. असा विद्यार्थीवर्गच नवीन विचार घेण्यास समर्थ असतो. अशा विद्यार्थ्यांनी राजकारणाशी संबंध ठेवू नये, त्यांचे पुढारी बाहेरचे असू नयेत असे म्हणणे हास्यास्पद आहे आणि याच अर्थी पांढरीपांडे यांनी बहात्तर पानावर जी पथ्ये दिग्दर्शनार्थ सुचवली आहेत ती चुकीची वाटतात.

प्रथमखंडातच धर्मशिक्षण, शारीरिक शिक्षण, शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा यांचा विचार पांढरीपांडे यांनी केला आहे आणि तेथेही पुराणमतवादाचा आरोप त्यांच्यावरती करता येईल. धर्मशिक्षणाचे महत्व समजावून सांगता तर येत नाही व नाकारावेसे वाटत नाही अशी काहीशी येथे स्थिती झाली आहे. सर्व जुन्या गोष्टी नवीन परिस्थितीत बसवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या संबंधात नेहमी हीच गोष्ट होते.

शिक्षणपद्धतीची पुनर्रचना या दुसऱ्या खंडाचे पुन्हा दोन भाग पडतात. भारतातील प्राचीन शिक्षण पद्धती, अमेरिकन शिक्षण पद्धती, रशियातील शिक्षण पद्धती, शिक्षण पद्धतीपासून अपेक्षा आणि भारतीय शिक्षणपद्धतीचे उद्देश ह्या मुद्यांच्या आधारांनी केलेली चर्चा मुख्यत्वे करून तत्वज्ञानात्मक आहे. आणि त्या तत्वज्ञानाच्या बैठकीवर अध्यापन रीती, सहशिक्षण व लैंगिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, छात्रालये, शिक्षक, संचालक मंडळे व सरकार, विद्यापीठे यांचा उहापोह पांढरीपांडे यांनी केला आहे. शिक्षणाचे माध्यम व इंग्रजी भाषेचे स्थान, शिक्षकांच्या पेशातील संकटे हे अगदी वेगळे मुद्दे परिशिष्टवजा देता आले असते. कारण ते ज्या क्रमाने आले आहेत त्यात काहीच औचित्य नाही.


द्वितीय खंडातील हा तत्वज्ञानपर भाग जरा काळजीपूर्वक वाचला म्हणजे श्री. पांढरीपांडे यांच्या दृष्टीकोनाचा व त्यातून निर्माण होणाऱ्या दोषांचा विचार करणे सोयीचे जाते. भारतातील प्राचीन शिक्षण पद्धतीचा विचार केल्यानंतर त्यांनी तिच्या विशेषांची जी ग्राह्याग्राह्यता दिली आहे ती उद्बोधक आहे. प्राचीन पद्धती वेगळ्या रूपात त्यांना हवी आहे. त्या काळाच्या मानाने समाजरचना व सामाजिक परिस्थिती यात महदंतर पडले आहे. तेव्हा प्राचीन शिक्षण पद्धतीचे पुनरुज्जीवन शक्य नाही हे उघड आहे असे प्रतिपादन करूनही जी विशेषे आज उपयुक्त होतील असे जे म्हणतात ती खालील प्रमाणे (पान ११८)

१. छात्राची परीक्षा घेणारा गुरूच. त्याचे म्हणणे प्रमाण.

२. स्नातकाला एक वर्ष देशाटन

३. विद्या व व्यवसाय यांची सांगड (प्राचीन पद्धतीप्रमाणे)

अमेरिकेतील शिक्षण पद्धती आणि रशियातील शिक्षण पद्धती यांची मांडणी करतानाच पांढरीपांडे यांनी अशी काही केली आहे की त्यांची विचाराची बैठक स्पष्ट व्हावी. अमेरिकेतील विशेषांच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल ते लिहितात, 'भौतिक प्रगतीचे व धनधान्यसंपन्नतेचे शिखर गाठलेल्या देशाची ही शिक्षण पद्धती आहे. आपल्याला तिच्यापासून पुष्कळच शिकण्यासारखे आहे.' आणि अमेरिकेइतक्याच प्रगत रशियन शिक्षण पद्धतीबद्दल ते लिहितात,

त्याच्या शिक्षणाचा खर्च
दिवसें दिवस
वाढतच जाणार...



तुम्हांला परवडेल तो?

कां नाहीं? जरूर परवडेल!

निश्चितकाल ठेवींचे खातें तुम्ही आजच उघडलेत तर त्याच्या पुढील शिक्षणाच्या खर्चाबाबत कांही अडचणी येणार नाहीं. अधिक तपशीलासाठी आमच्या जवळच्या शाखेला आजच भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

7215DMar

समाजरचनेच्या वैशिष्टयावर शिक्षण पद्धतीचे स्वरूप अवलंबून असते. भारतातील समाजरचना कशी होणार आहे किंवा व्हायला पाहिजे या मुद्यांचा विचार करीत असतानाच वरील पद्धतीच्या ग्राह्यांशाचा विचार करता येईल. ' म्हणजे जणू काही अमेरिकेतील समाजरचना व भारतातील समाजरचना अगदी सारखी आहे व त्यामुळे अमेरिकेतील शिक्षण पद्धती जशीच्या तशी इथे लावता येईल.

आणि या दृष्टिकोनांतूनच श्री. पांढरी पांडे यांनी अध्यापन रीति, छात्रालये, शिक्षक आणि संचालक मंडळे यांचा विचार केला आहे. आपल्याकडील अनेक शिक्षणतज्ज्ञ ज्याप्रमाणे पाश्चिमात्य पद्धती संपूर्णपणे आपल्या देशात लागू करण्याचे विचार मांडतात तसेच विचार पांढरीपांडे यांनी व्यक्त केले आहेत. सहशिक्षण व लैंगिकशिक्षण या विषयावर लिहिताना मात्र अमेरिकेपासून ते खूपच दूर जातात. इथे प्राचीन भारतीय संस्कृतीचा आणि लैंगिक गोष्टींविषयीच्या कोत्या समजुतींचा त्यांच्या मनावरचा पगडा चांगलाच जाणवतो. लैंगिक शिक्षण व सहशिक्षण या प्रकरणाच्या शेवटी ते लिहितात, 'भारतीय समाजात फार प्राचीन काळापासून ब्रह्मचर्याला फार महत्व आहे. ते बळप्रद व तेजस्कर मानले गेले आहे. सारांश लैंगिक शिक्षण तरुणतरुणींना व समाजाला हितावह होईल असे वाटत नाही.'

प्रौढशिक्षण, विद्यापीठे याबद्दलही विचार पांढरपांडे यांनी द्वितीय खंडात केला आहे.

एवढ्यासाऱ्या चर्चेनंतर प्रस्तुत पुस्तकाला प्रारंभी दिलेले वैचारिक वाङ्मयाचे निकष लावले आणि पांढरीपांडे यांनी स्वतःच समारोपामध्ये घेतलेली तडजोडवादी भूमिका विचारात घेतली की एवढेच म्हणावेसे वाटते, की गेल्या पंचवीस वर्षात, स्वातंत्र्योत्तर काळात, भारतीय शिक्षण पद्धतीसंबंधी जे लिखाण केले गेले आहे त्याचा आढावाच फक्त पांढरीपांडे यांनी घेतला आहे. कोणत्याही वैचारिक बैठकीवर उभे राहून नवा दृष्टिकोन त्यांनी वाचकांपुढे ठेवलेला नाही. मराठी भाषेमध्ये अशा तऱ्हेचे लिखाण फार कमी होते त्या दृष्टीने मात्र या पुस्तकाला निश्चित असे महत्व आहे. भारतीय शिक्षण पद्धतीसंबंधी जुजबी माहिती सामान्य मराठी वाचकाला हे पुस्तक निश्चितच करून देईल. त्या दृष्टीने या पुस्तकाचे स्थान मान्य केले पाहिजे. ◻

**भारतीय उच्च शिक्षण**
कसे आहे ? कसे असावे ?
लेखक : श्री. ल. पांढरीपांडे
प्रकाशक : डॉ. ईश्वर देशमुख,
श्री. र. रा. कुलकर्णी

## मध्यंतर

कलोपासकांची 'मे'मधील

एकांकिका

# टायपिस्ट

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे) या संस्थेने मासिक एकांकिका प्रयोगामध्ये 'मे' महिन्यात 'टायपिस्ट' एकांकिका सादर केली. 'टायपिस्ट' ही Murray Schisgal या अमेरिकन लेखकाची एकांकिका अनुवादक आहेत वसंत कामत एका व्यापारी कंपनीच्या कार्यालयात दोन 'टायपिस्ट' कामाला असतात. एक स्त्री–एक पुरुष. त्यांच्या नोकरीच्या प्रारंभापासून ते साधारणत: निवृत्तीकाळापर्यंतचा कालखंड एकांकिने व्यापला आहे विशीपासून साठीपर्यंतचा उभयतांचा सहवास, परस्पर स्नेह मत्सर, लैंगिक आकर्षण, सहानुभूती, साहेबाबद्दलचा रागलोभ त्यामध्ये आहे. खरे तर ह्या दोन व्यक्तींच्या जीवनातील एका नोकरीच्या निमित्ताने घडलेला मनाच्या किंवा विचारांच्या आंदोलनांचा प्रवास !

ह्या आंदोलन-प्रवास इंग्रजीतून अनुवादीत करीत असताना मराठीत सफाईने आला नाही. तो अनुवादाचे निखळ समाधान देऊ शकला नाही. कित्येक ठिकाणी अनुवादाची भाषा तशीच ग्रंथरूप राहिली. त्यावर बोली भाषेचे, नाटयपरिणामाच्या दृष्टीने योग्य ते संस्करण अनुवादकारांकडून झालेले दिसले नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे मूळ इंग्रजी एकांकिकेतील आशय तितक्या ताकदीने आलेला नाही. याचे एक कारण म्हणजे अनुवादकारांनी काही वाक्यांचे अनुवाद गोळाबेरीज पद्धतीने केले आहेत, असे दिसते. एक महत्त्वाचे वाक्य सांगतो. 'I got on the wrong train by mistake' एकांकिकेत नाटयाशयाच्या दृष्टीने आणि व्यक्तिरेखनाच्याही दृष्टीने या वाक्याला विशेष महत्त्व आहे. अनुवाद करताना 'गाडीला खूप गर्दी होती, म्हणून गाडी चुकली, उशीर झाला...' वगैरे या आशयाचे वाक्य संहितेत आहे. आणखीही अशीच काही वाक्ये सांगता येतील. अनुवादकारांनी एकांकिकेत आशयदृष्टचा आणखी काही बदल केले आहेत. त्या पुरुषाच्या आईवडिलांना (निवेदनामध्ये) मारून टाकले आहे. तो पुरुष व्हिस्की पितो. ती प्यायल्यावर जीवनविषयक अनेक गोष्टी बोलतो.

मराठी अनुवादात 'पिणे' काढून टाकले आहे. हे बदल हेतुत: केलेही असतील. पण त्यामुळे नाट्यपरिणामाच्यादृष्टीने जमेच्या बाजूला काहीच आलेले नाही. उलट मूळ इंग्रजी एकांकिकेबद्दल लेखन-विषयक अनेक शंका मनात आल्या !

अनुवादातल्या काही उणीवांचा उल्लेख आवर्जून अशासाठी केला की, दिग्दर्शकांना त्यातल्या काही गोष्टी दुरुस्त करून घेता आल्या असत्या ! दिग्दर्शक होते वासुदेव पाळंदे. एकांकिकेतील कलाकार होते शोभा पत्की आणि श्याम जोशी. या दोघांनीही अत्यंत आज्ञाधारकपणे दिग्दर्शकाच्या सूचना तंतोतंत पाळल्या होत्या. एका अर्थाने हे कौतुकाचे आणि शिस्तीचे असले तरी परिणामी ह्यांचा अभिनय यांत्रिक पद्धतीने अभिव्यक्त झाला. ते दोघेही त्यांच्या भूमिकेमध्ये समरस झाल्याचे जाणवले नाही. सतत ते अभिनय करीत आहेत, याचाच प्रत्यय येत होता. त्यातल्या त्यात एकांकिकेच्या उत्तरार्धात भूमिकेजवळ जाण्याचा त्यांचा प्रयत्न जाणवत होता, पण तो फारच थोडा काळ या उणीवेमुळे एकांकिकेतील महत्त्वाचा आशय प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्यास ते असमर्थ ठरले. खाली राहिले ते केवळ शब्द ! त्या कोरड्या शब्दांमुळे अपरिहार्य असे कंटाळवाणेपण प्रेक्षकांच्या पदरी आले !

प्रत्येक माणसाच्या जीवनात त्याचे स्वत:चे असे एक जगणे असते. ते जगणे त्याचे एक स्वप्न असते. पण त्या माणसाला मात्र वास्तवाच्या भयाणतेमधून जीवनाचा सारा प्रवास करावा लागतो. त्या भयाण वास्तव प्रवासातही तो आपले स्वप्नील जीवन विसरू शकत नाही. त्याला ते विसरता येत नाही. वकील होण्याची महत्त्वाकांक्षा करणाऱ्या माणसाच्या जीवनात 'टायपिस्ट' होण्याचे दुर्दैव असावे, त्यातही असंख्य चुका व्हाव्यात, ही आणखी दुर्दैवाची गोष्ट. तरीही त्यातून इच्छित जीवनाची धडपड चालूच राहते. त्यातच नोकरी निमित्ताने आलेल्या स्त्रीचा स्नेहबंध, तिच्याबद्दलचे आकर्षण, नवे आयुष्य, नवी स्वप्ने, सहवासातून येणारा मत्सर इत्यादी सुप्त-प्रकट स्वरूपाच्या अनेक भावभावनांचे मिश्रण या एकांकिकेतील दोन स्वभावचित्रात एकांकिकाराला अभिप्रेत आहे; पण ते तितक्या ताकदीनें, सूक्ष्मतेने अभिनयाद्वारा व्यक्त झाले नाही. नुसत्या यांत्रिक हालचाली, संवाद ढोबळपणाने समोर आले. त्याने कोणताही परिणाम घडवला नाही. याला कारण दोन्ही कलाकार जितके आहेत तितकेच दिग्दर्शकही !

आणखी एक उल्लेख म्हणजे प्रकाश योजनेचा. रंगमंचाच्या शेजारच्या झाडावर लाल प्रकाशझोत टाकलेला होता. तो बदलत्या रंगाचा होता. पण नाट्यपरिणामाच्या दृष्टीने मात्र तो सर्वथा निरुपयोगी ठरला. त्याचा उपयोग अधिक चांगल्या तऱ्हेने व्हायला पाहिजे होता.

●

# गोची

## सृजनात्मक दिग्दर्शनाचा प्रत्यय देणारा नाट्यप्रयोग

पुष्पा भावे

रविवारी संध्याकाळी नाट्यप्रयोगाला जाणे ही खास सुखवस्तु मनाची सवय —छान कपडे करून रमतगमत आश्रयदात्याच्या तोऱ्यात जाऊन सुशीतल आसनावर बसायचे आणि नाटकवाले आपली करमणूक करतील म्हणून वाट पाहायची ! अशा प्रेक्षकांची करमणुक करणारे नाटकवालेही अनेकदा त्या प्रेक्षकाइतकेच नाट्यवस्तूपासून अलिप्त असतात—नाटककाराने लिहिलेले शब्द आणि दिग्दर्शकाने उभे केलेले नाटक प्रेक्षकांपुढे ठेवण्याची कृत्रिम साधने जणू काही ! परंतु गेल्या महिन्यात एका रविवारी संध्याकाळी रुइया महाविद्यालयाच्या एका खोलीत जमलेला प्रेक्षकवर्ग आणि विशेषत: तिथे उभे राहिलेले नाटक वेगळे होते. ते नाटक आणि नट इतके वेगळे होते की त्यामुळे आलेला प्रेक्षकवर्गही नकळत प्रभावित झाला. नाटक मुळातच नाट्यगृहाच्या बाहेर आले होते. त्या लहानशा सभागृहात रंगमंच उभारण्याचा प्रयत्न दिग्दर्शकाने केला नव्हता. प्रेक्षक सरळ भारतीय बैठकीवर बसले होते. अशा अनौपचारिक वातावरणात अमोल पालेकरांनी सदानंद रेग्यांचे 'गोची' सादर केले. रेग्यांची 'गोची' असे म्हटले खरे; परंतु या नाट्यप्रयोगाची जातच अशी होती की नाट्यवस्तु केवळ नाटककाराची राहिली. ती दिग्दर्शकाची —— नटांचीही झाली होती. किंबहुना 'अभिरुचि'च्या मे–जून, जुलै–ऑगस्ट' ७३) पृष्ठांवर असणारे 'गोची' नाटक आणि प्रेक्षकांसमोर उभे राहिलेले 'गोची' नाटक यात अंतर होते. तिथेच अमोल पालेकरांच्या सृजनात्मक दिग्दर्शनाचा आणि नटांच्या उत्स्फूर्त अभिनयाचा प्रत्यय आला.

गोची हा आजच्या तरुणांच्या बोलभाषेत नेहमी ऐकू येणारा शब्द आहे. स्थिर भाषेमध्ये नसणारा शब्द (अथवा वापराबाहेर फेकला गेलेला—) नव्याने बोलभाषेत येतो त्यावेळी तो शब्द नसतो. ती एका नव्या अनुभवाची प्रतिमा असते. आजच्या समाजमनातील एक सलच 'गोची' या प्रतिमेतून व्यक्त होते. 'गोची' या नाट्यानुभवाची जातच अशी आहे की तो अनुभव घटनात्मक रचनेतून व्यक्त होऊ शकणार नाही. कारण त्याअर्थाने या अनुभवाला कालाचे परिमाण नाही. काळाच्या व अवकाशाच्या विस्तीर्ण पोकळीत जगणारा मानवी जीव एका लहानशा कुडीत कुचंबलेल्या अवस्थेत जगत असतो. या कुडीतूनच नाती निर्माण होतात, या कुडीसाठीच दिनक्रमाची चाकोरी निर्माण होते; आणि मग हा जीव नात्यांनी वेढलेल्या कुटुंबामध्ये, दिनक्रमाच्या क्षुल्लक तपशीलामध्ये, घड्याळाच्या काट्यांमध्ये बंदिस्त होतो.

एखाद्या प्रचंड यंत्रणेतील क्षुल्लक अवयवाचे रूप त्याला प्राप्त होते. या जगण्याच्या यंत्रणेच्या कोलाहलात त्याला जे वाटते ते सांगण्यासारखे दुसरे मानवी मन त्याला सापडत नाही. तरी कधीतरी संवाद साधण्याचा, दुसऱ्यांशी नाही तर निदान आपुला आपल्याशी संवाद साधण्याचा तो केविलवाणा यत्न करतो. रेग्यांनी हा अनुभव एका 'डॅडी'च्या, कुटुंबप्रमुखाच्या, हरवण्यातून मांडण्याचा यत्न केला आहे. मला तर 'गोची' पाहताना, कधीतरी ऐकलेल्या बालकथेतील आगगाडीच्या डब्यापासून तुटून, रुळांपलीकडे वाट शोधणाऱ्या एका इंजिनाची आठवण होत होती.

सदानंद रेग्यांनी नाटयसंहितेत स्त्री, पुरुष, मुलगी, एकजण अशी पात्रनामे योजून वरील अनुभव अमूर्त आहे, विशिष्ट व्यक्तींच्या जीवनानुभवाला बांधलेला नाही हे प्रस्थापित केले आहे. हा नाटयानुभव अमूर्त असल्यामुळेच त्याची प्रयोगशैली वेगळी असावी' हे स्पष्ट होते, त्या शैलीचीही सूचना नाटककाराने 'टॅब्लो एक...दोन' या शब्दांतून केली होती. दिग्दर्शक अमोल पालेकरांनी नाटयसंहितेचे संपादन करून ती सादर करताना टॅब्लोपद्धतीचा पुरेपूर वापर केला. विनानेपथ्य सादर केलेल्या या प्रयोगात नाटकातील नटांच्या शरीरकृतींचाच नेपथ्य म्हणून वापर केला होता. मुक्त अवकाशात नृत्यात्मक पद्धतीने वावरणाऱ्या मुलगा व मुलगी या दोन पात्रांच्या हालचालींनी विविध विरचना निर्माण होत होत्या. अंगाला घट्ट बिलगलेल्या निळयाकाळया कपडयातल्या या दोन आकृत्या केवळ दृश्यात्मक विरचनेचे कार्य करीत नाहीत तर वृंदगायकाचे (आधुनिक स्वरूपातील) कार्यही करतात. अनुया पालेकर व कुळकर्णी या कलावंतांनी आपल्या अभिनयांतून हा गोचीचा नाटयानुभव, नाटयशैलीच्या अंगभूत समजुतीने व्यक्त केला. विशेषतः अनुया पालेकर यांनी न-अभिनयाची शैली आणि विरचनात्मक हालचाली यांतील तोल अत्यंत चातुर्याने साधला होता. 'स्त्री'ची भूमिका करणाऱ्या जुईली देऊस्कर या नटीला मात्र या नाटकातील अवघड अभिनय पेलत नव्हता. काही अत्यंत महत्त्वाचे शब्द या नटीच्या तोंडून केवळ घरंगळत गेल्यासारखे असमंजस वजनाने पडत होते. इन्स्पेक्टरची भूमिका करणाऱ्या बाळ कर्वे यांचा चेहरा, डोळयांच्या कोपऱ्यांना चुण्या घालण्याची लकब यामुळे नाटकाच्या अनुभवशी विरोध साधणारा विनोद व्यक्त करणे त्यांना सुलभ झाले. मुळात हा विनोद Black humour च्या पद्धतीचा असणे आवश्यक होते– लेखकाने त्याचे भान फारसे ठेवलेले नाही. तसे ठेवले असते तर बाळ कर्वे यांच्यासारख्या कलावंताचे या भूमिकेत चीज झाले असते. खूप वर्षांपूर्वी चंद्रकांत देशपांडयांच्या 'बस'मधील कंडक्टरची भूमिका बाळ कर्वेंनी केली होती. त्या अभिनयाचे स्मरण ज्यांना असेल त्यांना वरील विधानातील सत्य नेमके पटावे.

'पुरुषा 'ची भूमिका करणाऱ्या जयराम हर्डीकर या तरुण नटाला आपला ताठ रेषा असणारा चेहरा, किंचित खर असणारा आवाज परिणामकारक तऱ्हेने वापरण्याचे कसब साध्य झाले आहे. विशेषत: क्षणात डोळे-नजर शून्य (Blank) करण्याच्या त्यांच्या लकबीचा 'गोची 'तील नाती हरवलेला स्वत: पासून हरवलेला-स्वत:ला शोधणारा पुरुष उभा करताना त्यांना फार उपयोग झाला.

असा अमूर्त नाटचानुभव व्यक्त करणाऱ्या नाटककाराला नाटकाची भाषा तोडून पुन्हा घडवावी लागते. रेग्यांना या नाटचलेखनात अशा प्रयत्नात संपूर्ण यश आलेले नाही; परंतु लेखनातील हा कच्चेपणा पालेकरांनी दिग्दर्शनातील कौशल्याने भरून काढला आहे. साधेसुधे शब्द, वाक्य, मांत्रिक पद्धतीच्या उच्चारणातून त्यांनी परिणामकारक केले. ध्वनिमुद्रित ध्वनिसंकेत न वापरता प्रत्यक्ष मानवी आवाजमेळाची केलेली योजना, लाकडाच्या पट्टीचा कंपने नसणारा आवाज वापरण्याची कल्पना, नाटचशैलीच्या एकसंघ संकल्पनेतून पालेकरांना स्फुरल्या असाव्यात. अशा प्रकारच्या स्व. निर्मित साधनानेच प्रायोगिक रंगमंच समृद्ध होणार आहे. किंबहुना अलिकडे मंदावलेल्या प्रायोगिक चळवळीत पालेकरांच्या 'गोची 'मुळे नवी धग निर्माण झाली आहे.

या प्रयोगाच्याच वेळी 'हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे' याही नाटिकेचा प्रयोग झाला. त्याचे परीक्षण पूर्वी 'मध्यंतर 'मध्ये आले आहे. त्याचा पुन्हा उल्लेख केला याचे कारण ही 'Double billing' (दोन छोटी नाटके एकत्र करणे)ची प्रथा अत्यंत इष्ट आहे. इतर प्रायोगिक संस्थांनी अनुकरण करावी अशी आहे. या प्रथेचे मराठी नाटचलेखनावरही इष्ट परिणाम होऊ शकतील. अन्यथा, मराठी नाटककार नाटचानुभवाची स्वाभाविक मर्यादा लक्षात न घेता तीन तास वा अधिक चालेल असे नाटक लिहितात.

काही आठवडयांपूर्वी 'मध्यंतर 'मध्ये नाटचगृहाबाहेर नाटके करणाऱ्या पाश्चात्य नाटचसंस्थांविषयी दोन स्फुटे लिहिली होती. योगायोग असा की त्या पाठोपाठ पुण्याच्या 'महाराष्ट्रीय कलोपासक 'ने, मुंबईच्या 'अनिकेत 'ने असे प्रयोग सुरू केले आहेत. हौशी नाटचसंघही त्या दिशेने विचार करीत आहे, या श्रेयस्कर खुणा आहेत. नाटचमंदिरातील तारखा मिळविण्याची धडपड, प्रचंड भाडी, जाहिरातींचे दर या साऱ्यांतून मुक्त झाल्याशिवाय प्रायोगिक रंगमंच आगळचा निष्ठेने उभा राहू शकणार नाही; स्वत:चा वेगळा, अस्वस्थ होऊ शकणारा, अस्वस्थ होण्याचे भय न बाळगता रविवारी संध्याकाळी मुंबईच्या उकाडचात एका बंद खोलीत बसून 'गोची' पाहाणारा प्रेक्षक निर्माण करू शकणार नाही.

[ कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय 'मध्यंतर' हे सदर काही आठवडे बंद राहिले याबद्दल क्षमस्व ] ● ● ●

# नवगणिताचे एक वर्ष

पृष्ठ ७ वरून

आहे, विद्यार्थ्यांना पेलणार नाही, शिक्षकांनाही त्याचे आकलन होणार नाही अशी टीकेची प्रचंड झोड उठली. हे गणित हवे की नको या वादाने अनेक वर्तमानपत्रांचें रकाने भरविले गेले. वाद घालण्यात, जे हे गणित शिकवणार होते असे शिक्षकही सामील होते. तेव्हा मात्र शासन आपला पवित्रा बदलतेय की काय असे वाटले. पण शासनाने खंबीर राहून आपल्या निर्णयात बदल केला नाही. (नाहीतरी लोकांच्या टिकेने आपल्या निर्णयात बदल करण्याची शासनाला सवय नाही ! ) अर्थात शासनाच्या खंबीरपणाला काळ दुवाच देईल. या अभ्यासक्रमाचे एक वर्ष पूर्ण झाले. परीक्षा झाल्या निकालही लागले. पण त्यावरून विशेष काही बोध होणार नाही. सुट्टीत पुण्यामुंबईत खास पालकांसाठी नवगणिताचे वर्ग सुरू झाले. चाळीचाळीतून आणि वाड्यावाड्यांतून स्त्रीपुरुष हातात वह्यापेन्सिली घेऊन जातानाचे मनोरंजक दृश्य पहायला मिळेल. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या सर्वांना ढवळून काढणाऱ्या या नवगणिताचे या वर्षातील फलित काय याचा शोध घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

मे महिना म्हणजे शिक्षकांसाठी शासनाने चालविलेल्या मार्गदर्शन शिबिराचे दिवस. सर्व विषयांसाठी अशी शिबिरे असतात. यामध्येच नववीच्या नवगणितासंबंधी सुमारे सहाशे गणित शिक्षकांना मार्गदर्शन करणारे शिबिर पुण्याच्या पाचसहा शाळांतून भरले होते. गेल्या वर्षीच्या अभ्यासक्रमाबाबतीतील प्रतिक्रिया यांच्याकडूनच समजण्यासारख्या होत्या. म्हणून त्यांची भेट घेतली. सामान्यत: या शिबिरांतील शिक्षकांची व्यवस्था समाधानकारक असते. अर्थात काही ठिकाणी अपवाद असतात. असाच हा एक अपवाद.

स्थळ : एम्. ई. एस्. भावेस्कूल. शंभर शिक्षकांचा वर्ग येथे भरे. त्यातील एक तृतीयांश ग्रामीण भागातून आलेले. त्यांची निवासव्यवस्था शाळेत होती. शिबिराच्या आदल्या दिवशी रात्री हे पुण्यात पोचले. तेव्हा त्यांना शाळेच्या तिसऱ्या मजल्यावर नेण्यात आले. वर्गांना कुलूप आणि सज्जात संपूर्ण काळोख. वर्ग सकाळी उघडून देण्यात येतील, आजची रात्र सज्जात काढा असे त्यांना सांगण्यात आले. मग अंधारातच सर्वांनी पथाऱ्या पसरल्या. तेव्हा लक्षात नाही आले. सकाळी उठल्यावर लक्षात आले की उन्हाळ्यात चिमण्यांनी केलेल्या मुबलक ' उत्सर्जना 'वर आपण झोपलो होतो. सकाळी वर्ग उघडून दिले. एका वर्गात पाच शिक्षक. एरवी ही वाटणी पुरेशी; किंबहुना प्रशस्त म्हणावी अशी. पण केव्हा ? वर्ग रिकामा असतो, म्हणजे वर्गात बाकं नसतात तेव्हा. मग काय ! पाची जणांनी निम्मी बाके उचलून उरलेल्या बाकावर ठेवणे व तयार झालेल्या जागेत बिस्तारा

मांडणे. वर्ग झाडून वगैरे मिळण्याचे राहूद्याच पण स्वतः झाडायला केरसुण्या-सुद्धा वेळेवर मिळाल्या नाहीत. पहिले दोन दिवस पिण्याच्या पाण्याचीही सोय नव्हती. त्यासाठी सहा जिने उतरून खाली जावे लागे. विशेष म्हणजे या सर्व तक्रारी घेऊन काही शिक्षक शिबि-राच्या संचालकांकडे गेले. तेव्हा त्यांना संचालकांकडून 'रहायचं तर मुकाटयाने रहा नाहीतर एकेकाला हाकलून देईन' असा दम दिला गेला. न राहून काय करतात! कारण पुढे वर्षभर स्वतः-लाही नवीन असा विषय मुलांना शिक-वायचा होता ना!

हे थोडे विषयांतर झाले. पण ते करण्याचा उद्देश इतकाच की राष्ट्राची पिढी तयार करणे इ. इ. कार्ये ज्यांच्या हाती आहेत अशा शिक्षकांना कशी वागणूक मिळते ते दाखविणे. असो.

या शिक्षकांशी चर्चा केली ती दोन-तीन प्रश्नांभोवती. त्यातील एक प्रश्न असा, की हा विषय तुम्हाला नीट कळला का, म्हणजे मुलांना शिकवता येण्याइतका कळला का? हा प्रश्न विचारण्याचे कारण म्हणजे शिक्षकात पदवीधर जसे होते तसेच बिगरपदवी-धरही. पदवीधरांपैकी अनेकांचा एस्. एस्. सी. नंतर गणिताशी संबंध नव्हता. म्हणजे बहुतेकांचा गणिताचा अभ्यास एस्. एस्. सी. पर्यंत आणि तोही जुन्या पद्धतीने-मर्यादित होता. अर्थात या प्रश्नाला नकारार्थी उत्तर मिळण्याचा संभव नव्हताच. कारण विषय स्वतःला जरी नीट कळला नाही तरी तसे कबूल कोण हो करील! पण एकजण तसेही भेटले. त्यांनी खुल्लंखुल्ला कबूल केले की आपल्याला ही नवगणिताची भानगड विशेष काही कळलीच नाही. मग मुलांना शिकवले कसे? तर जमेल तसे! त्यातही कहर म्हणजे दुसऱ्या शाळेतील शिक्षकांनी पेपर काढूनही यांची नव्वद टक्के मुले पास! पेपर स्वतःच तपासल्यावर नव्वदच काय शंभरटक्केही पास झाली असती. पण मग संशय आला असता म्हणे. आता ही मुले नववीतही यथास्थित पास


सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय. हीरक महोत्सवानिमित्त
विविध सुखसोयी–अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह

## सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड

क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई २

**मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था**

होतील. दहावीत म्हणजे एस्. एस्. सी. त मात्र त्यांचे पितळ उघडे पडेल. या विद्यार्थ्यांच्या कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरिंग, मेडिकल वगैरेंच्या वाटा आत्ताच बंद झाल्यासारख्या आहेत. या शिक्षकांसारखे आणखीही बरेच शिक्षक असणार, त्यांच्या हाताखालील हजारो विद्यार्थ्यांना पुढे कॉलेजमध्ये शास्त्रशाखेत प्रवेश मिळणार नाही. यात या शिक्षकांचाच सर्व दोष नाही. केवळ पंधरा दिवसाच्या तुटपुंज्या, घाईगर्दीत उरकलेल्या शिबिरांतून त्यांच्या डोक्यात नवगणित भरले गेले आणि हे आपापल्या गावी गेल्यावर पुढे वर्षभर त्यांचा शहराशी संबंध नाही, तज्ज्ञांशी भेटी नाही, चर्चा नाही, काही नाही. फक्त ते आणि त्यांचे विद्यार्थी.

ग्रामीण भागातील शिक्षकांना आणखी एका अडचणीला तोंड द्यावे लागते ते मात्र शासनाच्या भोंगळपणामुळे. ग्रामीण भागात प्राथमिक शाळा म्हणजे पहिली ते सातवी, आणि हायस्कूल म्हणजे आठवीच्या पुढे. त्यात काही हायस्कूलसना पाचवी ते सातवीचे एकेक वर्ग भरविण्याची परवानगी दिलेली. प्राथमिक शाळेतील पाचवी ते सातवीच्या मुलांना जुना अभ्यासक्रम शिकवला जातो आणि हायस्कूलमधील पाचवी ते सातवीला नवीन अभ्यासक्रम शिकवला जातो. दोन्ही शाळातून जेव्हा आठवीत मुले प्रवेश करतात तेव्हा त्यांच्यात आपोआपच दोन तट पडलेले असतात. यामुळे शिक्षकांची पंचाईत होते. याचे छोटेसे उदाहरण म्हणजे आठवीच्या गणितातील पुस्तकात आकडे आणि दर्शक अक्षरे इंग्रजीत आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रथम ए बी सी डी आणि इंग्रजी आकडे शिकवावे लागतात. तसेच आठवीत प्रवेश करणाऱ्या मुलाला बीजगणिताचे प्राथमिक ज्ञान झालेले असते. पण ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेत सातवीपर्यंत ते शिकवले जात नाही त्यामुळे आठवीत काही विद्यार्थ्यांसाठी ते प्रथम शिकवावे लागते. याला काही उपाय नाही का? शहरास ज्याप्रमाणे पहिली ते चौथी म्हणजे प्राथमिक व पाचवीपासून पुढे हायस्कूल अशी पद्धत असते तशी इथे का नाही? ग्रामीण भागातील हायस्कूलसची पाचवीपासून वर्ग भरविण्याची तयारी आहे. पण त्यांना परवानगी मिळत नाही. कारण सध्या प्राथमिक शाळेत सातवीपर्यंत जे वर्ग आहेत ते बंद पडतील, आणि शिक्षकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. शिवाय हे शिक्षक अनट्रेन्ड, त्यांना हायस्कूलमध्ये कुणी ठेवणार नाही. त्यामुळे आहे तसेच चालू आहे आणि पुढेही असेच चालू रहाणार आहे.

आणखी एक छळणारी अड्चण म्हणजे पुस्तकांची. सरकारने शालेय पुस्तकांचा कारभार ताब्यात घेतल्यावर पुस्तके वेळेवर न मिळण्याची फॅशनच झाली आहे. नववीच्या गणिताची पुस्तके तयार होताहेत. शिबिरातल्या शिक्षकांना पुस्तकाच्या कच्च्या प्रती देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या हाती ही पुस्तकं पडायला अजून एक दोन महिने

लागतील. आणि सर्वांनाच याच पुस्तकांवर अवलंबून रहायचे आहे. कारण खाजगी प्रकाशकांना या विषयावर पुस्तकं काढण्यास बंदी! सरकारने नेमलेल्या लेखक मंडळाने ही पुस्तके तयार करून कधीच सरकारकडे दिली होती. त्यांच्या अंदाजाप्रमाणे मागील महिन्यातच पुस्तके बाजारात यावयास हवी होती. हे एक झाले. दुसरे असे की सरकारी पुस्तकांच्या किंमती माफक असतात अशी सामान्य माणसाची समजूत, पण ती चुकीची आहे आता या गणिताच्याच पुस्तकाच्या किंमती पहा ना. भूमितीच्या पुस्तकाची किंमत आहे पावणेपाच रुपये. बीजगणिताच्या पुस्तकाची किंमत अजून ठरायची आहे. पण तीही तेवढीच असणार. म्हणजे नववीच्या विद्यार्थ्याला एका गणित विषयासाठी तब्बल दहा रुपये खर्च करावे लागणार. आज महाराष्ट्रातील किती विद्यार्थ्यांना ही पुस्तके घेणे परवडेल याचा साधा विचार सरकारने केला आहे का?

या विषयाच्या संबंधातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी. त्यांना मात्र या विषयाचा विशेष बाऊ वाटत नाही. उलट शिकताना एक 'थ्रिल' वाटते. त्यामुळे शिक्षकांनाही उमेद वाटते. शिक्षकांच्या पुढील बहुसंख्य अडचणींवर सहज मात करता येण्यासारखी आहे. शहर विभागातील शिक्षकांना विशेष अडचणी नाहीत. अडचणी आहेत या ग्रामीण भागातील शिक्षकांपुढे. त्या दूर करण्यासाठी शासनाप्रमाणेच शहरातील शैक्षणिक सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला तर शिक्षकांचा आत्मविश्वास नक्कीच वाढेल. या शिक्षकांचा शहराशी वारंवार संबंध येईल अशी यंत्रणा उभारून त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे, त्यांना उद्भवणाऱ्या अकल्पित अडचणी आणि शंका यांचे त्वरित निरसन केले पाहिजे. सर्वंकष प्रयत्न झाले तरच ग्रामीण भागात आधुनिक ज्ञानविज्ञानाची गंगा वाहू लागेल.

सध्या मात्र विद्यार्थ्यांचा उत्साह आणि शिक्षकांची उमेद यांच्या गाडीला शासनाच्या भोंगळ कारभाराचे ब्रेक करकचून लागलेले दिसतात.

ते जितके लवकर ढिले होतील तितके हिताचे, शिक्षकांच्या विद्यार्थ्यांच्या आणि देशाच्याही! ● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

**ले. : अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

# महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवकवर्ग

वि. शं. पारगावकर

पुणे विद्यापीठातील विधिसभेतील अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये विद्यापीठाच्या काही सदस्यांनी प्राध्यापकांच्या आर्थिक परिस्थितीविषयी काही विचार मांडले आणि अशी भावना व्यक्त केली की प्राध्यापक वर्गावर आर्थिक काटकसरीचा भार पुणे विद्यापीठाने टाकू नये. झोपडपट्टीत किंवा अन्य दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यापीठाच्या क्षेत्रातील प्राध्यापक हाही एक दुर्बल घटक असल्याने त्यांच्यावर आर्थिक काटकसरीचा भार टाकला जाऊ नये, एका वेगळ्या संदर्भात महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाच्या आर्थिक कुचंबणेविषयी विद्यापीठाच्या सदस्यांनी व्यक्त केलेले हे विचार निश्चितच स्वागतार्ह आहेत.

परंतु याच महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवकवर्गाच्या आर्थिक परिस्थितीविषयी सहानुभूतीने विचार करण्याची वरील सदस्यांना अद्याप गरज वाटलेली नाही. उलट विद्यापीठाला या बाबतीत काही करता येईल की नाही याची शंका परवाच्याच एका सभेत व्यक्त केली गेली.

परिस्थिती मात्र अशी आहे की महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाच्या वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान मंडळाने ठरवून दिल्या आहेत. डेमॉन्स्ट्रेटरपासून ते वरिष्ठ प्रोफेसरपर्यंतच्या वेतनश्रेणीमध्ये तर्कशुद्धता आणि व्यवहाराशी सांगड हे दोन्ही गुणविशेष ठळकपणे दिसतात. तसे ते शिक्षकेत्तर सेवक वर्गामध्ये मुळीच दिसत नाहीत. उलट या गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता जशी विद्यापीठांना वाटत नाही तशीच ती सरकारच्या शिक्षणखात्यालाही वाटत नाही – आजवर वाटलेली नाही असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

महाराष्ट्रातील बहुसंख्य महाविद्यालये खासगी आहेत. काही प्रसिद्ध अथवा अप्रसिद्ध शिक्षणसंस्थांच्या मार्फत ती चालविली जातात. त्यामधील काही शिक्षणसंस्था जशा प्रसिद्ध आहेत तशाच प्रतिष्ठितही आहेत. त्यांच्या मार्फत ही महाविद्यालये फार चांगली चालविली जातात. बऱ्याचशा संस्थांनी तर आपल्या कार्याचे शतकही पुरे करीत आणलेले आहे. तरीही या संस्थांची महाविद्यालये अद्यापही परावलंबीच राहिलेली आहेत. सरकारकडून, विद्यापीठ अनुदान मंडळाकडून या विद्यालयांना वर्षांनुवर्षे अनुदान

मिळतच असते. तरीही तेथील नोकरवर्गाची – विशेषत: शिक्षकेतर नोकरवर्गाची आर्थिक परिस्थिती सुधारू शकत नाही. देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या पंचवीस वर्षांत देशातील इतर क्षेत्रात झपाटयाने वाढ होत गेलेली दिसते. उद्योगधंद्याच्या क्षेत्रात सुधारणा झालेली आहे, खासगी क्षेत्रातील उद्योगधंदे भरभराटीला आलेले आहेत. त्यातून त्यांना अफाट नफा मिळत आहे. तेथील नोकरवर्ग – कामगारवर्गही समाधानात आहे. सुखासुखी व जाणीवपूर्वक सहज रीतीने तेथील चालकांनी आपल्या नोकरवर्गाच्या आर्थिक स्थितीकडे दुर्लक्ष केले तर हा नोकरवर्ग संपावर जातो. आपापल्या संघटनांमार्फत आपली परिस्थिती चालकांसमोर मांडतो, आपल्या किमान मागण्या व अपेक्षा त्यांच्या कानावर घालतो. आणि त्या मागण्या मान्य करून घेतल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. सरकारी क्षेत्रात तर नोकरवर्गांना सुखासमाधानात ठेवणे राज्यशकट चालविण्याच्या दृष्टीने सरकारला आवश्यकच असते. इतके करूनही सरकारी नोकरवर्गही संपावर जातो. पे कमिशनची नियुक्ती करण्यास सरकारला भाग पाडतो. महागाई भत्त्यात वेळोवेळी वाढ करवून घेतो. त्यांना प्रॉव्हिडंट फंड असतो, ग्रॅच्युइटी असते आणि पेन्शनही असते.

तसेच देशातील विमाव्यवसाय आणि बँकातील नोकर वर्गाचे असते. त्यांचे पगार चांगले असतात, प्रवासाची सोय त्यांच्यासाठी केलेली असते. त्यांना वैद्यकीय मदत असते. आणि काय नसते ? असाच प्रश्न विचारणें युक्त ठरेल ! एस्. टी. चा नोकरवर्ग, कॉर्पोरेशनमधील नोकरवर्ग सर्वांची या बाबतीत महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक वर्गाशी तुलना करता येण्यासारखी आहे.

इतकेच नव्हे तर कालपर्यंत महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवकवर्ग व त्याच शिक्षण संस्थांमधील शाळेतील सेवकवर्ग यांची श्रेणी एक होती. पण सरकारच्या शिक्षणखात्याने शाळातील या सेवकवर्गाकडे कृपादृष्टी टाकली आणि त्यांचीही आर्थिक परिस्थिती आणि आजवर वरील दोन्ही संस्थांमधील या सेवकवर्गाची वेतनश्रेणी जी एक होती तिच्यात केवढातरी फरक पडला. म्हणजे महाविद्यालयातील शिक्षिकेतर सेवकवर्ग जिथल्या तिथेच राहिला ! कारण त्याचेकडे सहानुभूतीने पाहणारे असे कोणीच नाही. शिक्षण संस्थांना आर्थिक बोजा पेलत नाही, सरकारचे शिक्षणखाते म्हणते हा प्रश्न त्यांच्या विचाराच्या किंवा अधिकाराच्या कक्षेत येत नाही. आणि विद्यापीठांचाही तोच दृष्टीकोन आहे. अशा परिस्थितीत या वर्गाने शेवटी पाहावयाचे तरी कोणाच्या तोंडाकडे.

महाविद्यालयातील कामाचा ताण दिवसेंदिवस सारखा वाढत आहे. सहज विचार केला तर असे दिसून येते की गेल्या सात आठ वर्षांत महाविद्यालयातील काम पूर्वीपेक्षा दुपटी तिपटीने

वाढलेले आहे. जबाबदाऱ्या आहेत. शिवाय या वाढलेल्या कामानुसार त्याप्रमाणात सेवक वर्गातही वाढ केलेली क्वचितच दिसते. म्हणजे हा सारा कामाचा आणि जबाबदाऱ्यांचा बोजा आहे त्याच तोकड्या संखेत असलेल्या सेवक वर्गावर पडतो.

पडणाऱ्या जबाबदाऱ्यांना अनुसरून या सेवक वर्गाला वेधनश्रेणी नसते. सरकारी क्षेत्रात काम करणाऱ्या याच प्रतीच्या सेवकवर्गाला किती तरी अधिक वेतनश्रेणी असते आणि इतर आर्थिक लाभ असतात आणि त्याच्याच बरोबरीने, त्याच्याच दर्जाचे काम करणाऱ्या या सेवकवर्गाला मात्र तसा आर्थिक लाभ मिळत नाही. वैद्यकीय मदत मिळत नाही, रजेचे व सुट्यांचे काही ठराविक नियम नसतात. पेन्शन अथवा ग्रॅच्युइटीचे तर नावच सोडा. अशा परिस्थितीत त्याचे भवितव्य जर त्याला अधांतरी वाटत असले तर तो त्याचा दोष म्हणता येईल का ?

या आजच्या परिस्थितीत फार झपाट्याने सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारने किंवा विद्यापीठाने अथवा त्या त्या शिक्षण संस्थेने अत्यंत आपुलकीने या प्रश्नात लक्ष घातले पाहिजे. महाविद्यालयांच्या सर्वांगीण उन्नतीचा, हा घटक एक अविभाज्य भाग आहे अशी भावना हा प्रश्न सोडविताना निर्माण होणे आवश्यक आहे.

प्रिंसिपॉल, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर सेवक वर्ग आणि विद्यार्थी मिळून संपूर्ण


जेव्हा लेखणीतून शब्द नाही,
ठिणग्या फुलतात.
तेव्हा प्रकाशित होते...

# रणांगण

पाक्षिक

संपादक : अनिल बर्वे

किंमत : चाळीस पैसे

एक जून अंकात...

१. पुण्यातील दंगल जातीय का शासकीय ? —संपादकीय.

२. हाय ग इंदिरे, तुझ्या राज्यात बेचाळीस हरिजनांना जिवंत जाळणारे निर्दोष सुटतात !

वेण्णमणी हत्याकांड निकालपत्रावर एक जळजळीत लेख.

३. उध्वस्त भिवंडीतील त्या सात अस्वस्थ दिवस-रात्री !

गजानन जागीरदार यांनी बलराज सहानींच्या सांगितलेल्या आठवणी.

हे आणि इतर असेच लेख.

वार्षिक वर्गणी दहा रुपये
आजच वर्गणीदार व्हा.
संपर्क : अनिल बर्वे
५२८ नारायण पेठ
भटवाडी, पुणे ३०.

संस्था होते. यापैकी कोणत्याही घटकाकडे दुर्लक्ष होणे एकूण संस्थेच्या विकासाच्या दृष्टीनेच अयोग्य आहे. शहरातील महाविद्यालयांतून विद्यार्थीसंख्या तीन-तीन हजारांच्या जवळपास असते. त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी जशी त्यामुळे जिकीरीची, जबाबदारीची आणि कठीण होऊ शकते, तशीच त्यांना द्यावयाच्या असलेल्या शिक्षणेतर सेवांचा प्रश्नही तितकाच जिकीरीची आणि कठीण असतो. दररोज शेकडो विद्यार्थी आपले नवेनवे प्रश्न घेऊन महाविद्यालयीन कार्यालयात घेत असतात. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे हे वेखील अत्यंत डोकेदुखीचे काम असते; त्यांचे प्रश्न सोडविणे तर त्याहूनही.

दररोज परिस्थितीत बदल होत असतो. सरकारचे नवेनवे नियम, विद्यार्थ्यांसाठी नव्या सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या नित्यनूतन अपेक्षा यांची सांगड घालणे व्यावहारिक दृष्टीने फार अवघड काम होऊन बसलेले आहे. एकूण म्हणजे एखाद्या महाविद्यालयाचे नाव चांगले असले किंवा वाईट असले तर त्या चांगलेपणात किंवा वाईटपणात शिक्षकेत्तर सेवक वर्गाच्या कामाचा मोठा वाटा असतो. अशी परिस्थिती असताना या सेवकवर्गाच्या सुविधांकडे मात्र लक्ष कोणाचेच जाऊ नये याचे आश्चर्य वाटते.

ही परिस्थिती आता झपाट्याने बदलली पाहिजे. या वर्गाला आपल्या कामाचे योग्य चीज होत आहे, आपण दुर्लक्षिले जात नाही आहोत, आपण महाविद्यालयीन कामकाजाचा एक अविभाज्य घटक आहोत हे मानले जात आहे, आपल्या सेवेचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्याला आर्थिक आणि इतरही सेवाविषयक सुविधा देण्याच्या मनस्थितीत सरकार अथवा तत्सम जबाबदार संस्था आता आल्या आहेत अशा प्रकारचा दिलासा या सेवक वर्गाला मिळाला पाहिजे.

सर्व भारतातील सोडा पण निदान महाराष्ट्रातील महाविद्यालयांतून तरी सेवाविषयक नियम समान असावेत, महाविद्यालयातून निर्माण होणाऱ्या कमी अधिक जबाबदाऱ्यानुसार त्यांच्या वेतनश्रेणी ठरविल्या जाव्यात आणि वर्षानुवर्षे दूर सारला गेलेला हा महाविद्यालयांतील एक घटक शासकांच्या व्यवहार दृष्टीच्या आणि सहानुभूतीच्या जवळ यावा. महाराष्ट्र सरकारने या बाबतीत पुढाकार घ्यावा आणि विशेष अनुदान देऊन या प्रश्नाच्या योग्य सोडवणुकीसाठी त्यात पूर्ण लक्ष घालावे अथवा असे लक्ष घालण्यात विद्यापीठांना व्यवहाराच्या पातळीवरून मदत करावी आणि असे झाले तरच या सेवक वर्गाची आज त्रिशंकूप्रमाणे झालेली अवस्था बदलेल.

● ● ●



# लिफ्ट

**पंडित क्षीरसागर**

ब्रह्मानंद समोर पाहून गाडी चालवीत होता. त्याच वय चाळीस वर्षांचं होतं. त्यानं लग्न केलं नव्हतं ऑफीसात भरपूर काम करणं एवढाच त्याला छंद होता. त्यामुळं त्याला भराभर बढत्या मिळत गेल्या होत्या. आज तो कंपनीत मोठ्या हुद्यावर व लठ्ठ पगारावर होता.

मध्ये त्याची प्रकृती थोडी बिघडली होती तेव्हा डॉक्टरनं त्याला सल्ला दिला होता. ' हवापालट करा. ऑफीस विसरा. त्यासाठी हे गाव सोडा. कुठ-ल्याही गावी जा, हिंडा. फिरा. मजा करा. '

त्याप्रमाणं तो आज गादी घेऊन

निघाला होता. ठराविक ठिकाणी जायचं असं त्यानं ठरवलं नव्हतं. एखादं गाव बरं वाटलं तर एक दोन दिवस तिथं रहायचं, नाहीतर पुढल्या गावी चालू लागायचं.

आता तो गाडी चालवत होता. समोर रस्त्यावर मधोमध एक माणूस दोन्ही हात वर करून त्याला गाडी थांबवण्यास सांगत होता.

आत्तापर्यंतच्या प्रवासात रस्ता अगदी मोकळा होता. आजूबाजूला रम्य वनश्री होती. रंगीबेरंगी पक्षी उडताना दिसत होते. त्यामुळं त्याचं मन प्रसन्न झालं होतं. एवढ्यात तो माणूस दिसला आणि त्याच्या प्रसन्नतेला तडा गेला. नाईलाजानं त्यानं गाडी थांबवली. तो माणूस जवळ आला व म्हणाला, 'नमस्ते. तुम्ही कुठंवर जाणार ?'

"नक्की नाही. असाच रस्त्यानं सरळ जाणार."

"मग ठीक आहे. येथून पंधरा मैलावर मला जायचं आहे. कृपया लिफ्ट द्याल काय ?"

त्याला बोलण्याला अवसरही न देता त्या मनुष्यानं त्याचं सामान मागच्या सीटवर टाकलं व तो पुढं ब्रह्मानंदा-जवळ बसला. ब्रह्मानंद मुकाट्यानं गाडी चालवू लागला.

निवांत एकट्यानं गाडी चालवण्यात किती मजा येत होती ! कुठून हा माणूस टपकला कुणास ठाऊक ? त्यानं तिरप्या नजरेनं त्या माणसाकडं नजर टाकली. तो मनुष्य भक्कम व बळकट दिसत होता. त्यानं गुडघ्यावर ठेवलेले हात मोठे थोराड दिसत होते. बोटं जाड होती.

त्या माणसानं सिगरेटचं पाकीट त्याच्यापुढं धरून विचारलं 'सिगरेट ?'

"नो. थँक्यू."

त्यावेळी त्याचा चेहरा दिसला. तो कठोर दिसत होता. नाक बसकं होतं. पण त्या माणसाच्या जाडजूड हाताचं त्याला नवल वाटत होतं. ते हात त्याला हिंसावादी वाटत होते. कुणाचाही गळा


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

दाबण्यास ते हात योग्य होते.

ब्रह्मानंद मनाशी थोडा हसला डॉक्टरांनी त्याला कल्पनाशक्ती स्वैर सोडू नका म्हणून सांगितलं होतं परंतु रस्त्यावर मोटारीतल्या एकट्या दुकट्या माणसाला गाठून हल्ला करून लुबाडण्याचे प्रकार त्याने ऐकले व वाचले होते. तसा प्रकार हा माणूस करणार नाही ना?

ब्रह्मानंदाच्या कपाळावर घर्मबिंदू गोळा झाले. त्याच्या हृदयाची धडधड त्याला स्पष्ट ऐकू येऊ लागली. भीतीची सणक त्याच्या मणक्यातून गेली.

तो मोठ्या वेगानं गाडी चालवू लागला. जितक्या लवकर ह्या माणसाचं उतरण्याचं ठिकाण येईल तितकं बर असा हिशोब त्यानं मनाशी केला होता.

त्यानं त्या माणसाच्या पायाकडं पाहिलं. त्याच्या पायात मिलीटरी टाईपचे जाडजूड बूट होते. बुटाखाली एक लोखंडी कांब होती. ती त्यानंच तेथे ठेवली होती. आता ती कांब तेथे ठेवल्याचा त्याला पश्चाताप झाला. तो माणूस ती कांब केव्हाही हातात घेऊ शकेल आणि...

तो शहारला. त्यानं गाडीचा वेग आणखीच वाढविला. तो माणूस आपल्या चेहऱ्याकडे निरखून पाहत आहे असं त्याला जाणवलं. ह्यामुळं त्याच्या मनावर एक प्रकारचं दडपण आल्यासारखं त्याला वाटलं.

नंतर त्या मनुष्यानं खाली वाकून ती लोखंडी कांब हातात घेतली व दोन गुडघ्यामध्ये उभी करून तो ती फिरवण्याचा चाळा करू लागला. ब्रह्मानंदाचा श्वासच कोंडल्यासारखा झाला. रस्त्यानं कुणीही दिसत नव्हतं. सर्व लोक परग्रहावर वस्ती करायला गेले होते की काय कोणास ठाऊक? रस्त्यावर कोणीतरी माणूस दिसल्याशिवाय गाडी थांबवायची नाही असं त्यानं ठरवलं.

एवढ्यात तो माणूस म्हणाला, "गाडी जरा थांबवा."

त्याबरोबर ब्रह्मानंद चरकला. त्याचा अंदाज बरोबर होता. त्यानं ॲक्सीरेटरवरचा पाय दाबला. गाडी साठ मैलाच्या वेगानं निघाली. तो मनुष्य चिडून म्हणाला, "गाडी थांबवा." त्याच्या नजरेत संताप दिसत होता. ब्रह्मानंद म्हणाला, "कशासाठी?"

तो माणूस तोंडातल्या तोंडात काही बोलला हे त्याला कळलं नाही. त्या माणसानं करंगळी दाखवली त्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्यानं गाडी थांबवली.

त्या माणसानं दार उघडलं. ब्रह्मानंदानं क्षणात मनाशी निर्णय घेतला. दार उघडल्याबरोबर त्यानं त्या माणसाला बाहेर ढकलून दिलं आणि पुन्हा गाडी भरधाव सोडली. तो मनुष्य कोलमडत खाली पडला. नंतर त्यानं त्या माणसाचं सामान एका हातानं धरून तेही बाहेर फेकलं. गाडी जोरात जात होती.

त्यानं मागं पाहिलं. तो मनुष्य रस्त्यावर उभं राहून जोरजोरात ओरडत होता. पण आता त्याला भीती नव्हती. तो एकटा होता.

काही वेळ त्यानं जोरात गाडी दाम-

टली. कपाळावरून घामाच्या धारा वाहत होत्या. छाती धडधडत होती. नंतर त्यानं वेग कमी केला. खिशातून हातरुमाल काढून चेहरा पुसला.

आणि एकाएकी मोठा आवाज झाला. टायर बर्स्ट झाला हे त्यानं ओळखलं. शिव्या देतच तो खाली उतरला. त्या माणसापासून तो फक्त एकच मैल पुढं आला होता. तो मनुष्य इथं यायच्या आत टायर काढून स्टिफनी बसवून झाली पाहिजे.

तो घाईघाईनं मागं गेला. डिकीची किल्ली लावताना त्याचा हात थरथर कापत होता. डिकी उघडायला त्याला पाच मिनिटं लागली. नंतर त्यानं आतून स्टिफनी, जॅक काढला. जॅक लावून तो पंक्चर झालेलं टायर काढू लागला. पण हे काम त्याला करायची फारशी पाळी येत नसे. त्यामुळं चाकाचे स्क्रू त्याला निघता निघेनात. ते फार टाईट बसले होते. तो गाडीखाली धुळीत पडून प्रयत्न करू लागला. कसंवसं त्यानं चाक काढलं व स्टिफनी बसवण्याच्या तो उद्योगाला लागला. त्यानं सहज मागं नजर टाकली. दूरवरून तो माणूस भराभर चालत येत होता.

बापरे! आता काय करायचं? त्यानं घाईघाईनं स्टिफनी बसवली. जॅक व पंक्चर चाक डिकीत टाकलं. डिकीला कुलूप लावण्याच्या भानगडीत तो पडला नाही.

परंतु एवढ्या वेळात तो माणूस जवळ आला होता. त्याला वाटलं, त्या माणसाची क्षमा मागून मोकळ व्हावं. म्हणजे तो काही करणार नाही. परंतु त्याचा उपयोग झाला नाही तर! तो गाडीत बसला व त्यानं चारी काचा वर ओढून घेतल्या. ती लोखंडी कांब मांडीवर आडवी टाकून बसला. तो माणूस आपल्याला ठार करणार असं त्याला वाटत होतं. गाडी सुरू करायला वेळच नव्हता. म्हणून ती लोखंडी कांब गरगर फिरवीत तो स्वस्थ राहिला. मृत्यू केव्हा येतो याची तो भीतीनं वाट पहात होता.

तो माणूस मोटारीजवळ आला. त्यानं सामान पाठीवर टाकलं होतं. तो



माणूस काचेतून ब्रह्मानंदाकडं पाहू लागला. एकवार दोघांचे डोळे एकमेकांच्या डोळ्याशी टक्करले.

आणि तो माणूस एकदम आडव्या बाजूनं धावत निघाला. त्याचं सामान खाली पडलं. ते घेण्याचाही त्यानं प्रयत्न केला नाही, तो भरवेगानं धावत होता.

काही वेळानं तो माणूस ट्रकमध्ये बसून ड्रायव्हरला म्हणत होता, " शपथ सांगतो. त्या माणसाच्या हातात लोखंडी कांब होती. मी जर मोटारीचं दार उघडलं असतं तर त्यानं मला त्या कांबेनं चांगलंच झोडपलं असतं. ठारसुद्धा मारलं असतं. "

आणि इकडे गाडी चालवता चालवता तासापूर्वीची आपली स्थिती ब्रह्मानंदाला आठवत होती परमेश्वर आपल्याला कधी धैर्य व बेडरपणा देणारच नाही का? दुबळ्या मनानं अन् हृदयानंच सारं आयुष्य काढायचं का? त्याच्या डोळ्यात अश्रू चमकत होते. ● ● ●

# रंगतरंग स्पर्धा

११ एप्रिल, ७३

स. न.

१५ ऑगस्टला आपण रंगतरंग स्पर्धा चालू केली होती. तिचा निकाल केव्हा लागेल ? कोणत्या अंकात दिसला नाही. सवडीने खुलासा व्हावा ही विनंती.

-अण्णा शिरगावकर, दाभोळ

□ निकाल एप्रिल अखेर तयार होईल असे वाटले होते. पण परीक्षक मंडळाची शेवटची बैठक लांबणीवर पडली, त्यामुळे ही वेळ पाळता आली नाही याचा खेद वाटतो.

आता ही बैठक जूनच्या दुसऱ्या आठवड्यात ठरली आहे. म्हणजे या स्पर्धेचा निकाल 'माणूस' जून १६ किंवा २३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

कळावे. लोभ व विश्वास असावा ही विनंती.

—संपादक

# कांदा !

## ३२ महिन्यांत ३३ लाखांचा बट्ट्याबोळ

नासिक जिल्ह्यातील एक स्फोटक प्रकरण

पुढील अंकी

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH-649

वर्ष तेरावे : नववर्षाची नवी रुपया भेट

# माणूस

## चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी

प्रसिद्धी : महिन्यातून दोनदा

आकार : मासिकाचा

किंमत : शंभर पैसे, अंकास

वर्षभरातली किमान दहा निवडक पुस्तकांची ही त्रयोदशवर्षीय कांगारू भेट न चुकविण्यारखी....

---

**ही कांगारू पुरवणी लवकरच प्रकाशित होत आहे.**

---

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**